मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २८३ ■ शुक्रवार, २६ जून २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# यंदाची आषाढी वारी जगभर पोहोचणार

## डिस्कव्हरी आणि जिओग्राफी वाहिन्यांवरून थेट प्रक्षेपण

**मुंबई :** महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेल्या यंदाच्या आषाढी वारीचा सोहळा डिस्कव्हरी आणि जिओग्राफी या आंतरराष्ट्रीय दूरचित्रवाहिन्यांद्वारे जगभर पोहोचणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिली.



सरकारने वारीची सर्वंकष तयारी पूर्ण केली असून लाखो वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संपूर्ण प्रशासन युद्धपातळीवर काम करत आहे. वारीत कोणत्याही वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देशही फडणवीस यांनी दिले.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज विधानभवनात पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या पूर्वतयारीबाबत आढावा बैठक झाली. पालखी मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, राष्ट्रीय महामार्गावरील विकासकामे, मुक्कामस्थळी जर्मन हँगर, पाणी, स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षा यंत्रणा यांची सक्षम व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व प्रमुख पालख्यांच्या मुक्कामस्थळी प्रशस्त हँगर उभारण्यात आल्याने लाखो वारकऱ्यांना पावसाळ्यात सुरक्षित निवारा मिळणार असल्याचे फडणवीस म्हणाले.यावेळी पालखी सोहळा प्रमुखांच्या बहुतांश मागण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. विशेषतः महिला वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी मुक्कामस्थळी विशेष उपाययोजना करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.

### डिजेमुक्त वारीसाठी प्रयत्न

दरम्यान, पुणे विभागाबाहेरील पालख्यांनाही समान सुविधा मिळाव्यात यासाठी सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची नोडल पालकमंत्री आणि पुणे विभागीय आयुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. डीजेमुक्त आणि पारंपरिक वारीसाठी पोलीस प्रशासनाने सर्व घटकांशी समन्वय साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

### आषाढी वारीसाठी प्रशासन सज्ज

■ पालखी मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती

■ सर्व प्रमुख मुक्कामस्थळी जर्मन हँगरची उभारणी

■ महिला वारकऱ्यांसाठी विशेष सुरक्षा व्यवस्था

---

# 'बँक ऑफ इंडिया'ला १ कोटी डॉलर्स देण्याचे नीरव मोदीला आदेश

**नवी दिल्ली :** पंजाब नॅशनल बँक घोटाळ्यातील आरोपी आणि २०१९ पासून लंडनच्या तुरुंगात असलेला फरार हिरे व्यापारी नीरव मोदी याला आणखी एक मोठा कायदेशीर धक्का बसला आहे. लंडनच्या सर्किट कमर्शियल कोर्टाने नीरव मोदीला 'बँक ऑफ इंडिया'चे १०.७ दशलक्ष डॉलरपेक्षा जास्त (सुमारे १०० कोटी रुपयांहून अधिक) कर्ज फेडण्याचे आदेश दिले आहेत.

### प्रकरणाची पार्श्वभूमी

हे प्रकरण नीरव मोदीच्या दुबईस्थित 'फायरस्टार ग्रुप'च्या कंपनीला दिलेल्या कर्जाशी संबंधित आहे. २०१२ मध्ये बँक ऑफ इंडियाने 'फायरस्टार डायमंड एफझेडई' या कंपनीला कर्ज सुविधा दिली होती. यावेळी नीरव मोदीने या कर्जासाठी 'वैयक्तिक हमी' दिली होती. कंपनी कर्ज फेडण्यात अपयशी ठरल्याने बँकेने नीरव मोदीविरुद्ध वसुलीची कायदेशीर प्रक्रिया सुरू केली होती.

### न्यायालयाचा निर्णय

मंगळवारी दिलेल्या निकालात न्यायालयाने बँक ऑफ इंडियाच्या बाजूने कौल दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, नीरव मोदीने दिलेल्या वैयक्तिक हमीनुसार तो कर्ज फेडण्यास कायदेशीररित्या जबाबदार आहे. थकीत रक्कम सुमारे ४.१ दशलक्ष डॉलर (सुमारे ३८.९ कोटी रुपये) तर एकूण देय व्याजासह ही रक्कम १०.७ दशलक्ष डॉलरच्या पुढे आहे.

---

# पावसाच्या सरींसोबत श्रीवर्धनमध्ये गणरायाच्या आगमनाची चाहूल; बाप्पाच्या मूर्ती घडवण्याच्या कामाला सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित :** कोकणात पावसाची चाहूल लागली की, प्रत्येक कोकणवासीयांच्या मनाला ओढ लागते ती लाडक्या गणपती बाप्पाच्या आगमनाची. पावसाच्या सरींसोबतच आता गणेशोत्सवाची लगबगही हळूहळू सुरू होत असून, घराघरांत आणि मूर्तिकारांच्या कार्यशाळांमध्ये तयारीला वेग येत आहे.

श्रीवर्धनमध्येही गणपती बाप्पाच्या आगमनाची तयारी सुरू झाली असून, येथील ओंकार आर्ट मध्ये गणेशमूर्तींना आकार देण्याचे काम सुरू झाले आहे. मूर्तिकार आपल्या कलाकुसरीने बाप्पाच्या विविध आकर्षक रूपांना साकारण्याच्या कामात व्यस्त झाले आहेत.



मूर्ती तयार करण्यापासून त्यावर बारकाईने नक्षीकाम करण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर कलाकार मेहनत घेत आहेत. येत्या गणेशोत्सवासाठी भक्तांच्या पसंतीनुसार विविध आकार, रूप आणि आकर्षक शैलीतील गणेशमूर्ती घडवण्याचे काम सध्या सुरू आहे. लवकरच या मूर्तींना रंगरंगोटी करून सजवण्याच्या प्रक्रियेलाही सुरुवात होणार आहे.

कोकणातील गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो परंपरा, संस्कृती आणि भावनेचा एक मोठा सोहळा मानला जातो. मुंबईसह विविध शहरांमध्ये राहणारे चाकरमानीही गणपती बाप्पाच्या आगमनासाठी आतुर झालेले असतात.

पावसाच्या सरी, हिरवाईने नटलेला निसर्ग आणि गणरायाच्या तयारीची सुरू झालेली लगबग यामुळे श्रीवर्धनमध्ये आता गणेशोत्सवाचे वातावरण हळूहळू निर्माण होत आहे. मूर्तिकारांच्या हातून आकार घेत असलेला प्रत्येक बाप्पा भक्तांच्या घरातील आनंद आणि श्रद्धेचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

---

# श्री चंडिका देवी गृहनिर्माण संस्था (एसआरए) नियोजितच्या अध्यक्षपदी अजित म्हामुणकर यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**मुंबई किशोर गुडेकर विभागीय संपादक :** जोगेश्वरी (पूर्व) येथील श्री समर्थ हायस्कूल येथे श्री चंडिका देवी गृहनिर्माण संस्था (एसआरए) नियोजितची सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. या सभेत संस्थेच्या नवीन कार्यकारिणीची निवड सर्वानुमते करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष, दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे अजित म्हामुणकर यांची संस्थेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.



या निवडीमुळे संस्थेच्या पुनर्विकास व एसआरए प्रकल्पाच्या कामकाजाला अधिक गती मिळेल, असा विश्वास सभासदांनी व्यक्त केला. नव्याने निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी आनंद जाधव व सुरेश तिवारी, सचिवपदी प्रवीणकुमार यादव, सहसचिवपदी प्रशांत परगे, हृदयनाथ गुरव व आशिष मिश्रा यांची निवड करण्यात आली.

तसेच कोषाध्यक्षपदी रमेश मांजरेकर, संयुक्त कोषाध्यक्षपदी सचिन आयरे, सुधा त्रिपाठी व अजित सिंग यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून नरेश देवडिगा, कृष्णा नार्वेकर, अनिल पाल, सुरेखा वाडकर, सर्वदानंद दुबे, सबाजित यादव, अरुण यादव, गोपाल सिंग, प्रदीप मिश्रा आणि नितीन गुडेकर यांची निवड करण्यात आली आहे.

निवडीनंतर अध्यक्ष अजित म्हामुणकर यांनी संस्थेच्या सर्व सभासदांचे आभार मानत, एसआरए प्रकल्प यशस्वी करण्यासाठी पारदर्शक व लोकाभिमुख कारभार करण्याचा निर्धार व्यक्त केला. संस्थेच्या सर्व सदस्यांनी एकत्रितपणे काम करून रहिवाशांच्या समस्या सोडविणे, पुनर्विकास प्रक्रियेला गती देणे आणि सर्वांना न्याय मिळवून देणे हे आपले प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

सभेच्या शेवटी नव्याने निवडून आलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे उपस्थितांनी अभिनंदन केले. तसेच त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि रहिवाशांच्या हितासाठी नवीन कार्यकारिणी प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वास सभासदांनी व्यक्त केला.

श्री चंडिका देवी गृहनिर्माण संस्था (एसआरए) नियोजितदुकान क्र. 15, सुंदरा निवास, वेस्टर्न एक्स्प्रेस महामार्ग, जेव्हीएलआर रोड, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई – 400060.

---

# केंद्रीय मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांचा जनसंपर्क

## कार्यक्रम महाल येथील गडकरी वाडा येथे २८ जूनला

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी महाल येथील गडकरी वाडा येथे आयोजित करण्यात आला आहे. महालातील गडकरी वाडा येथे मा. मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मा. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या



समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मा. मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत ना. श्री. नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

---

# 30 जूनपर्यंत कर्ज खाते नियमित करा; कर्जमाफी व प्रोत्साहन अनुदानासाठी सुवर्णसंधी

**दैनिक युवक आधार**

**देवणी, तालुका लातूर प्रतिनिधी पांडुरंग कदम :** राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी कर्ज खाते नियमित (चालू) करण्याची विशेष संधी उपलब्ध करून दिली असून, 30 जून 2026 पर्यंत थकीत कर्ज खाते नियमित करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना भविष्यातील कर्जमाफी योजना तसेच प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे, असे आवाहन देवणी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन विजयकुमार लुले, व्हाईस




चेअरमन शिवाजीराव तापसाळे व सचिव शिवनखेडे यांनी केले आहे.

मार्च सन 2026 पासून थकीत असलेली कर्ज खाती तसेच मार्च 2025 पर्यंत नियमित करण्यात आलेल्या खातेदार शेतकऱ्यांनाही शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी ही सुवर्णसंधी असल्याचे त्यांनी सांगितले. 30 जून 2026 पर्यंत खाते नियमित न केल्यास प्रोत्साहनपर अनुदानाच्या ₹50 हजार लाभापासून तसेच थकीत व चालू खाते दोन्ही सवलतींपासून वंचित राहणार आहे.सोसायटीकडून थकीत कर्जावर सुमारे 11 टक्के दराने व्याज आकारले जात असल्याने शेतकऱ्यांनी अतिरिक्त आर्थिक भार टाळण्यासाठीही ही संधी साधावी, असे आवाहन करण्यात आले आहे. शासनाच्या परिपत्रकानुसार उपलब्ध करून देण्यात आलेली ही विशेष मुदत आता अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपली आहे.त्यामुळे देवणी परिसरातील सर्व थकीत खातेदार शेतकऱ्यांनी 30 जून 2026 पूर्वी आपले कर्ज खाते नियमित करून शासनाच्या विविध लाभांसाठी पात्रता कायम राखावी, असे आवाहन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

---

# कापूस पीक प्रात्यक्षिकात लागवड अंतराचे काटेकोर पालन करावे !!

## केंद्र पुरस्कृत कापूस उत्पादकता अभियान !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी अकोला :** केंद्र पुरस्कृत कापूस उत्पादकता अभियान (कापूस कांती) सन २०२६-२७ अभियानांतर्गत पिकाची उत्पादकता वाढ व सुधारित वाणांच्या प्रसारासाठी कापूस पीक प्रात्यक्षिके १०० टक्के अनुदानावर शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था यांच्यामार्फत राबविण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केलेल्या शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, कृषी क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था यांची प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर निवड झाली आहे.



या शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी / कृषि क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था यांनी पेरणी करतांना लागवड अंतराचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे यांनी केले आहे.

पीक प्रात्यक्षिके : क्लोजर स्पेसिंगमध्ये लागवड अंतर ९०.३० सेमी आणि कापूस बियाणे पाकीट संख्या (हे) १० पाकीट, तसेच सघन कापूस लागवडमध्ये लागवड अंतर ९०.१५ सेमी आणि कापूस बियाणे पाकीट संख्या (हे) १५ पाकीट असावी. त्याचप्रमाणे, एकात्मिक पिक व्यवस्थापनात अंतर ९०.६० सेमी आणि कापूस बियाणे पाकीट संख्या (हे) ५ पाकीट (आंतर पिक पद्धतीने) असावी.

अधिक माहितीकरिता कृषि विभागाच्या सहाय्यक कृषि अधिकारी, उप कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डॉ.मुरली इंगळे, यांनी केले आहे.

# कोकणातील वणव्यांबाबत आ. प्रशांत ठाकूर आक्रमक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** कोकणातील आंबा व काजू बागांचे वणव्यांमुळे होत असलेले मोठे नुकसान आणि वनगुन्ह्यांमधील कारवाईचा प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत आक्रमकपणे उपस्थित केल्यानंतर राज्य सरकारने वनक्षेत्रात आग लावणे अथवा वणवे लावण्याच्या घटनांना पूर्णपणे आळा घालण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. वने मंत्री गणेश नाईक यांनी यासंदर्भात कठोर उपाययोजनांची घोषणा केली. भविष्यकाळात महाराष्ट्रातील कोणत्याही वनक्षेत्रात आग लावणे किंवा वणवे लावण्याला पूर्णपणे आळा घालण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती राज्याचे वने मंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली. वनसंपदेचे संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि वन्यजीवांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्य सरकार कठोर उपाययोजना राबविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कोकणातील काजू आणि आंबा बागांमध्ये लागणाऱ्या वणव्यांचा प्रश्न अत्यंत गंभीर असून त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात उपस्थित केला. वणव्यांच्या घटनांमध्ये हजाराहून अधिक वनगुन्हे नोंदविले गेले असतानाही दोषींवर ठोस कारवाई का होत नाही, असा सवाल त्यांनी शासनाला विचारला. सभागृहात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न पोटतिडकीने मांडला. त्यांनी मुद्दा उपस्थित करताना म्हंटले कि, यावर्षी अवकाळी पाऊस आणि विविध नैसर्गिक कारणांमुळे आंबा व काजू उत्पादक शेतकरी आधीच संकटात सापडले आहेत. त्यातच वन विभागाच्या हद्दीत लागणाऱ्या आगींमुळे लगतच्या खाजगी आंबा-काजू बागादेखील जळून खाक झाल्याच्या घटना वाढल्या




आहेत. शासनाच्या उत्तरात खाजगी क्षेत्रातील आगींसाठी वन विभाग जबाबदार नसल्याचे नमूद करण्यात आले असले, तरी वनक्षेत्रात १,१३८ आगीच्या घटना घडल्याचे आणि संबंधितांवर वनगुन्हे दाखल झाल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. यावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी, दाखल झालेल्या वनगुन्ह्यांपैकी किती प्रकरणांमध्ये दोषसिद्धी झाली, किती तपास पूर्ण झाले, किती जणांवर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आणि प्रत्यक्ष कारवाई किती झाली, याची माहिती सभागृहात मागितली. केवळ गुन्हे नोंदवून प्रश्न सुटणार नसून दोषींना शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.वणवे रोखण्यासाठी केवळ जनजागृती पुरेशी नसल्याचे नमूद करत, वारंवार आग लागणाऱ्या भागांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जबाबदार व्यक्तींवर कडक कारवाई करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच पेंच व्याघ्र प्रकल्पात वापरल्या जाणाऱ्या रिअल-टाइम मॉनिटरिंग सिस्टीम, एआय-आधारित कॅमेरे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कोकणातील वनक्षेत्रातही करण्याचा विचार शासनाने करावा, अशी मागणी वजा सूचना केली.

## वनक्षेत्रात आग लावणे किंवा वणवे लावण्याला पूर्णपणे आळा घालणार; कठोर उपाययोजना करणार – वने मंत्री गणेश नाईक

यावर उत्तर देताना राज्याचे वने मंत्री गणेश नाईक यांनी कोकणातील वणव्यांचा प्रश्न गंभीर असल्याची कबुली दिली. पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये वणव्यांच्या घटना वारंवार घडत असल्याचे त्यांनी सांगितले. वने मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा ठाणे वनविभागात १,००९ वणव्यांच्या घटनांमध्ये सुमारे १,६५९ हेक्टर क्षेत्र जळाले आहे. कोल्हापूर प्रादेशिक विभागात ३४ घटनांमध्ये ८५ हेक्टर, तर मुंबई पश्चिम विभागात ९५ घटनांमध्ये १४५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. राज्यभरात वणव्यांशी संबंधित १,२२६ वनगुन्हे नोंदविण्यात आले असून त्यांचा तपास सुरू आहे. वणव्यांची प्रमुख कारणे म्हणून शेतीतील पाला-पाचोळा जाळणे, विडी-सिगारेटची थोटके निष्काळजीपणे फेकणे, तसेच शिकारीसाठी किंवा जंगलातील फळे-फुले गोळा करण्यासाठी जाणीवपूर्वक आग लावणे यांचा उल्लेख त्यांनी केला. शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी ग्रामपंचायत, ग्रामसभा, लोकप्रतिनिधी आणि विविध शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून मोहीम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. पेंच व्याघ्र प्रकल्पात वापरल्या जाणाऱ्या रिअल-टाइम मॉनिटरिंग सिस्टीमप्रमाणे सर्व यंत्रणा राबविण्यात सुरुवात झाली असून वन विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वणव्यांबाबत सतर्कता वाढविण्याचे काम सुरू केले आहे. भविष्यात वन विभाग आणि कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना प्रशिक्षण, अग्निशमन साधने आणि ब्लोअर यांसारखी यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्याचे नियोजनही करण्यात येत आहे. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी महसूल, कृषी, पोलीस आणि वन विभाग यांच्या समन्वयातून दोषींना शोधून कठोर कारवाई करण्याची मागणी केली. त्यावर प्रतिसाद देताना वने मंत्री गणेश नाईक यांनी संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेऊन प्रतिबंधात्मक आणि प्रभावी उपाययोजनांबाबत आवश्यक सूचना देण्याचे आश्वासन सभागृहात दिले.

# शासकीय माध्यमिक आश्रमशाळा बोपेगाव येथे 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात संपन्न!

**दैनिक युवक आधार**
**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड :** दिडोरी/-बोपेगाव येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत बारावा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक महेंद्र कोतकर होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक विकास सोनवणे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

"आजच्या या स्पर्धेच्या आणि धावपळीच्या युगात माणूस नेहमी तणावाखाली वावरत असतो. अशा वेळी दररोज योगासने व प्राणायाम केल्यास आपण मानसिकदृष्ट्या नक्कीच सक्षम राहू शकतो. या माध्यमातूनच विद्यार्थी खऱ्या अर्थाने तणावमुक्त होतील," असे प्रतिपादन मुख्याध्यापक महेंद्र कोतकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले.

कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून क्रीडा शिक्षक विलास गायकवाड यांनी काम पाहिले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून २१ सामूहिक सूर्यनमस्कार व विविध योगासने करून घेतली. यामध्ये प्रामुख्याने वृक्षासन, ताडासन, पद्मासन, त्रिकोणासन, चक्रासन, भुजंगासन या आसनांचा समावेश होता. या वेळी गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना निरोगी आरोग्यासाठी योगासनांचे महत्त्व पटवून दिले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपशिक्षक जगन्नाथ रंधवे, गोरखनाथ देशमुख, विजेंद्र पाटील, सुनील भागवत, झांबरू चौधरी, तसेच उपशिक्षिका सुलभा अहिरे, प्रतीक्षा पवार, जयमाला भामरे, आशा डोखे, सीताबाई हडस आणि शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन उपशिक्षिका सुलभा अहिरे यांनी केले, क्रीडा शिक्षक विलास गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# आशा सेविका निर्मला दाभणे यांच्या प्रयत्नांमुळे आदिवासी रुग्णावर 5 लाखांची हृदय शस्त्रक्रिया मोफत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** योग्य वेळी दिलेली मदत एखाद्याचे आयुष्य बदलू शकते' याचा प्रत्यय पुन्हा एकदा पनवेलमध्ये आला आहे. नेरे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत येणाऱ्या मोरबे गावच्या आशा सेविका निर्मला सुरेश दाभणे यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे आणि अथक परिश्रमातून आयुष्मान भारत योजनेची एक कौतुकास्पद यशोगाथा समोर आली आहे. त्यांनी या योजनेचा लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचवत एका रुग्णाला नवीन आयुष्य मिळवून दिले आहे.

मोरबे येथील आदिवासी वाडीत राहणाऱ्या एका रुग्णास हृदयाची झडप बदलण्याची तातडीची व अत्यंत महत्त्वाची शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता होती. या मोठ्या उपचारासाठी डॉक्टरांनी सुमारे 5 लाख इतका खर्च अपेक्षित असल्याचे सांगितले होते. मात्र, संबंधित कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने एवढी मोठी रक्कम उभी करणे आणि हा खर्च सोसणे त्यांच्यासाठी पूर्णपणे अशक्य होते. यामुळे कुटुंब अत्यंत हतबल झाले होते. रुग्णाची ही गंभीर परिस्थिती आणि कौटुंबिक अडचण लक्षात घेऊन आशा सेविका निर्मला दाबणे यांनी तात्काळ पुढाकार घेतला. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही रुग्णाला वेळेवर 'आयुष्मान भारत कार्ड' उपलब्ध करून देण्यासाठी विशेष आणि प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले आणि रुग्णाचे आयुष्मान कार्ड वेळेत तयार झाले. या कार्डच्या आधारे नेरूळ येथील डी. वाय. पाटील हॉस्पिटलमध्ये

## आयुष्मान भारत कार्ड ठरले 'संजीवनी'

रुग्णावर अत्यंत अवघड अशी हृदय शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत आणि यशस्वीरीत्या पार पडली. केवळ एका आयुष्मान भारत कार्डमुळे या गरीब कुटुंबाचा तब्बल 5 लाखांचा मोठा आर्थिक भार वाचला आहे. आरोग्य उपचारांवर स्वतःच्या खिशातून करावा लागणारा खर्च या कार्डमुळे शून्य झाला, ज्यामुळे या कुटुंबाला खूप मोठा दिलासा मिळाला आहे. आशा सेविकांचे समर्पण, त्यांची मेहनत आणि लोकसेवेची प्रामाणिक भावना ही अनेक गरीब व गरजू कुटुंबांना कशी नवसंजीवनी देऊ शकते, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. या उल्लेखनीय आणि सेवाभावी कार्याबद्दल निर्मला सुरेश दाभणे यांचे सर्व स्तरातून मनःपूर्वक अभिनंदन व कौतुक होत आहे.

# हिंगणगाव येथे शेतकरी पिता–पुत्रावर जीवघेणा हल्ला; आरोपींवर कठोर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नगर, प्रतिनिधी :** नगर तालुक्यातील हिंगणगाव येथे जनावरांना पाणी पाजण्यासाठी विहिरीवरील मोटार सुरू करून पाईप जोडणी करत असताना झालेल्या वादातून शेतकरी पिता-पुत्रावर अमानुष मारहाण झाल्याची धक्कादायक घटना रविवारी (दि. १४ जून २०२६) घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेत शिवाजी सोनवणे यांचा डावा खांदा फ्रॅक्चर झाला असून त्यांचे पुत्र संभाजी सोनवणे यांनाही चाकू व लाकडी दांड्याने मारहाण करण्यात आल्याने ते गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवाजी सोनवणे हे जनावरांना पाणी पाजण्यासाठी विहिरीवरील मोटार सुरू करून पाईप जोडणी करत असताना गुलाब भास्कर सोनवणे, त्यांचा मुलगा अक्षय सोनवणे आणि ओंकार यांनी त्यांना अडवून धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर बापू बन्सी सोनवणे आणि अक्षय सोनवणे यांनी आणखी सुमारे दहा जणांना बोलावून शिवाजी सोनवणे आणि त्यांचे पुत्र संभाजी सोनवणे यांच्यावर हल्ला केल्याचे पीडित कुटुंबीयांचे म्हणणे आहे.

या मारहाणीत शिवाजी सोनवणे यांचा डावा खांदा फ्रॅक्चर झाला, तर संभाजी सोनवणे यांना चाकू व लाकडी दांड्याने मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात त्यांचा जीव थोडक्यात बचावल्याचा दावा कुटुंबीयांनी केला आहे.

घटनेनंतर दोन्ही जखमींना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करण्यात आले आहेत. या प्रकरणाची चौकशी MIDC पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान, हिंगणगाव परिसरातील नागरिकांनी अशा गुंड प्रवृत्तीला आळा बसावा आणि गरीब शेतकरी कुटुंबाला न्याय मिळावा, अशी मागणी केली आहे. दोषींवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा घटना घडू नयेत, अशी अपेक्षा गावकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. आरोप हे पीडित पक्षाच्या म्हणण्यानुसार असून, प्रकरणाचा तपास पोलीस प्रशासनाकडून सुरू आहे.

# ज्ञानविकास विद्यालयात सुलभक व प्रशिक्षक शिक्षकांचा गौरव

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** भराडी (ता. सिल्लोड) येथील ज्ञानविकास विद्यालयात (अशोकदादा गरुड शैक्षणिक समूह) इयत्ता दुसरी, तिसरी व चौथीच्या नवीन अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणामध्ये विशेष योगदान देणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

राज्यस्तरावरील प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून 'सुलभक' (मास्टर ट्रेनर) म्हणून जबाबदारी स्वीकारल्याबद्दल शिक्षक संदीप साळवे व शिवाजी गायकवाड, तर जिल्हास्तरावरील प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल गणेश ठोंबरे, बेबी भडगे व सुनीता काकडे यांचा संस्थेच्या



वतीने सन्मान करण्यात आला. हे शिक्षक आता तालुकास्तरावर नवीन अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अन्य शिक्षकांना प्रशिक्षित करणार आहेत. या उल्लेखनीय कार्याबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# रोहिदास वाडा परिसरातील वीज केबल दुरुस्त; वीजपुरवठा सुरळीत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** शहरातील रोहिदास वाडा परिसरातील आदित्य महादेव, मारुती आर्केड, जय श्रीराम, सनशाईन वसुंधरा तसेच इतर अनेक इमारतींमध्ये काल रात्रीपासून पहाटे 4 वाजेपर्यंत वीज केबलमध्ये बिघाड झाल्याने वीजपुरवठा कमी-जास्त होत होता. परिणामी पाण्याचे पंप आणि लिफ्ट सेवा देखील बंद पडली होती.

या समस्येबाबत आज सकाळी परिसरातील काही रहिवाशांनी नगरसेवक राजू सोनी, प्रभाग अध्यक्ष पवन सोनी तसेच त्यांचे सहकारी मंदार देसाई यांना माहिती दिली. माहिती मिळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि महावितरणचे मुख्य कार्यकारी अभियंता श्री. सातपुते यांच्याशी संपर्क



साधून पाठपुरावा केला. यानंतर महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी एमएसईबी कार्यालयाजवळील दत्त मंदिर डीपी ते पोटे मसाले डीपी दरम्यानची खराब झालेली थ्री-फेज केबल बदलून दिली. त्यामुळे परिसरातील वीजपुरवठा सुरळीत झाला असून पाणीपुरवठा आणि लिफ्ट सेवा पूर्ववत सुरू झाली आहे. वीजपुरवठा सुरळीत झाल्यानंतर परिसरातील रहिवासी व विविध सोसायट्यांच्या सदस्यांनी नगरसेवक राजू सोनी, पवन सोनी, मंदार देसाई तसेच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

# पिंपळा–बोरगांव शिवारात खरीप पेरणीला शुभारंभ; बळीराजाने केली भरघोस पावसासाठी प्रार्थना!

**दैनिक युवक आधार**
**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी :** पिंपळा(मालेगाव) तालुक्यातील बोरगाव-पिंपळ शिवारात खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना सुरुवात झाली असून पिंपळा येथील शेतकरी बांधवांनी पारंपरिक पद्धतीने ट्रॅक्टर व बीज पेरणी यंत्राचे विधिवत पूजन करून पेरणीचा शुभारंभ केला. यंदा अद्याप सर्वत्र समाधानकारक पाऊस झालेला नसला तरी पेरणीयोग्य पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी शेतात पेरणीची लगबग सुरू केली आहे. खरीप हंगाम हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात असल्याने पेरणीच्या प्रारंभामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भारतीय कृषी संस्कृतीमध्ये कोणत्याही शेतीकामाची सुरुवात धार्मिक विधी व पूजनाने करण्याची परंपरा आहे. त्यानुसार शेतकरी



बांधवांनी ट्रॅक्टर, बीज पेरणी यंत्र तसेच शेती अवजारांचे पूजन केले. नारळ फोडून, आरती करून आणि देवाचे स्मरण करत पेरणीच्या कामाला प्रारंभ करण्यात आला. यावेळी शेतकरी कुटुंबीयांनी शेतातील पिकांना भरघोस उत्पादन मिळावे आणि वर्षभर सुख-समृद्धी नांदावी यासाठी प्रार्थना केली.

बोरगाव-पिंपळ शिवारातील पिंपळा येथील शेतकरी बांधवांनी यावेळी निसर्गाकडे भावनिक साकडे घालत, "बळीराजाला सुखी ठेव, वेळेवर आणि भरपूर पाऊस पडू दे, शेतातील पिकांना पुरेसे पाणी मिळू दे आणि प्रत्येक शेतकऱ्याच्या कष्टाला यश मिळू दे," अशी प्रार्थना केली. तसेच यंदाचा खरीप हंगाम भरघोस उत्पादनाचा ठरावा, शेतीमालाला योग्य भाव मिळावा आणि शेतकऱ्यांच्या घरात आनंदाचे दिवस यावेत, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

सध्या परिसरातील शेतकरी सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कापूस यांसारख्या पिकांच्या पेरणीमध्ये व्यस्त आहेत. आधुनिक यंत्रसामग्रीच्या वापरामुळे पेरणीची कामे जलदगतीने होतअसून शेतकऱ्यांचा वेळ व श्रम वाचत आहेत. ट्रॅक्टरला जोडलेल्या बीज पेरणी यंत्राद्वारे कमी वेळेत अधिक क्षेत्राची पेरणी होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये आधुनिक शेती पद्धतींबाबत उत्साह दिसून येत आहे.खरीप हंगाम हा शेतकऱ्यांच्या वर्षभराच्या आर्थिक घडीचा पाया मानला जातो.

त्यामुळे वेळेवर पाऊस होऊन पिकांची वाढ चांगली व्हावी आणि भरघोस उत्पादन मिळावे, अशी आशा शेतकरी व्यक्त करीत आहेत. निसर्गाची साथ आणि शासनाच्या योजनांचा लाभ मिळाल्यास यंदाचा हंगाम शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरेल, असा विश्वासही शेतकरी बांधवांनी व्यक्त केला.

# रोटरी क्लबतर्फे के. व्ही. कन्या हायस्कूलला सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन भेट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल येथील के. व्ही. कन्या हायस्कूलमध्ये रोटरी क्लबच्या वतीने सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन प्रदान करून सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला क्लबचे अध्यक्ष निलेश पोटे, हितेश राजपूत, व्ही. सी. म्हात्रे, चारूदत्त भगत, ऋग्वेद कांडपीळे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद आणि विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत हा उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थिनींच्या आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले.




कार्यक्रमादरम्यान शाळेच्या मुख्याध्यापिकांनी व्ही. सी. म्हात्रे, अध्यक्ष निलेश पोटे तसेच रोटरी क्लबचे आभार व्यक्त करत त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. उपस्थितांनीही या उपक्रमाचे स्वागत करत अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

# चुका केल्या, पण कारणे तांत्रिक; नार्वेकरांचा खुलासा

**मुंबई :** पद्मविभूषण आशा भोसले यांच्या निधनानंतर विधानसभेत शोकप्रस्तावाचे वाचन करताना झालेल्या शब्दोच्चारातील चुकांवरून राज्यभर टीकेची झोड उठल्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बुधवारी सभागृहात दिलगिरी व्यक्त केली. मराठी भाषेबद्दल आपल्याला प्रचंड अभिमान असून, शोकप्रस्तावाच्या वाचनावेळी झालेल्या चुका या केवळ तांत्रिक कारणांमुळे झाल्याचा खुलासा त्यांनी केला.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सोमवारी आशा भोसले, पद्मभूषण सुमन कल्याणपूर यांच्यासह विधानसभेच्या माजी दिवंगत सदस्यांना विधानसभेत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राहुल नार्वेकर यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहताना शोकप्रस्तावाच्या वाचनात असंख्य चुका केल्या. या चुकांबाबत नार्वेकर यांच्यावर समाज माध्यमातून टीका झाली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही नार्वेकर यांना त्यांच्या मराठी वाचनावरून फटकारले होते.

या पार्श्वभूमीवर आज सभागृहाचे कामकाज सुरु होताच नार्वेकर यांनी याबाबत खुलासा करत दिलगिरी व्यक्त केली. त्या दिवशी सभागृहात एकूण १२ शोकप्रस्तावांचे वाचन करायचे होते. माझ्या हातात आलेली प्रत अत्यंत बारीक आणि अस्पष्ट फॉन्टमध्ये होती. त्यात काही तांत्रिक त्रुटीही होत्या, ज्या सुरुवातीला लक्षात आल्या नव्हत्या. त्यामुळे वाचन करताना जशा चुका मजकुरात होत्या, त्याचप्रमाणे त्या माझ्याकडून वाचल्या गेल्या. हे एका चुकीमुळे घडले असून त्याचा कोणीही वेगळा अर्थ काढू नये, असे नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

# पनवेल महानगरपालिकेतर्फे 'एकल महिला दिवस' निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** महाराष्ट्र शासनाच्या बालविकास विभागाच्या वतीने सूचित केल्यानूसार पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या सभापती ममता म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली 'आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त' दिनांक 23 जून रोजी "एकल महिला दिवस" कार्यक्रमाचे आयोजन जेष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात करण्यात आले.

महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.यावेळी महापालिका अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, महापालिका सदस्या दर्शना भोईर, रूचिता लोंढे, प्रिती जॉर्ज, स्नेहल ढमाले, बायजा बारगजे, डॉ. प्रियंका कांडपिळे, प्रतिभा म्हात्रे, सरस्वती काथारा, अस्मिता घरत, टाटा इन्स्टिट्यूटच्या स्वयंरोजगार उपजिविका तज्ज्ञ स्नेहल विचारे, उपायुक्त मंगला माळवे, अधिकारी कल्पना भामरे , अधिक्षक कविता मोकल, समाजविकास तज्ज्ञ स्वप्नाली चौधरी, डेएनयुएलएम व्यवस्थापक







विनया म्हात्रे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना सभापती ममता म्हात्रे म्हणाल्या, एकल महिलांच्या समस्या सोडविण्यावर महापालिका भर देत आहे. महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाकडे एकल महिलांनी त्यांच्या सूचना, अडीअडचणी यांची नोंद करावी. या सुचना महापालिका शासनाकडे पाठवेल, शासनाच्या प्रस्तावित एकल महिला धोरणांमध्ये याचा समावेश केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी महापालिकेच्या महिला विषयक धोरणांसंबधित माहिती दिली. तसेच महिलांनी स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने त्यांच्या काही स्वयंरोजगार संबधित संकल्पना असतील तर त्या मांडाव्यात ,म्हणजे त्यादृष्टीने महापालिका योजना राबवू शकेल असे सांगितले.

यावेळी उपायुक्त मंगला माळवे यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या 200 व्या जयंती वर्षानिमित्ताने त्यांनी केलेल्या कामाचा थोडक्यात परिचय करून दिला. तसेच महात्मा फुले यांनी विधवा महिलांच्या (एकल महिलांच्या) सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेल्या कार्याची माहिती दिली.टाटा इन्स्टिट्यूटच्या स्वयंरोजगार उपजिविका तज्ज्ञ स्नेहल विचारे यांनी सध्याच्या काळानुरूप आवश्यक अशा विविध रोजगार विषयीची माहिती महिलांना दिली.

तसेच जिल्हा महिला बालविकास कार्यालयाच्या अधिकारी कल्पना भामरे यांनी सांगितले की, शासन एकल महिलांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील आहे. महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती त्यांनी दिली. तसेच यावेळी प्रस्तावित शासनाच्या एकल महिला धोरणाबाबत माहिती दिली.तसेच डेएनयुएलएम व्यवस्थापक विनया म्हात्रे यांनी महापालिका बचतगटाच्या माध्यमातून करत असलेली कामे, डेएनयुएलम विभागाच्या माध्यमातून देत असलेली प्रशिक्षणे याविषयीची माहिती दिली. तसेच बचत गट नोंदणी, बचत गटांच्या माध्यमातून रोजगार निर्मितीबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थित महिलांच्या शासकीय कागदपत्रांबाबतच्या अडचणी जाणून घेऊन आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. या बरोबरच "आपले सरकार" पोर्टलसह विविध माध्यमांतून त्या सोडविण्यास मदत करण्याच्या दृष्टीने कनिष्ठ अभियंता कस्तुरी रेळेकर यांनी माहिती दिली.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. यावेळी महिलांच्या प्रश्न, सूचना आणि अपेक्षा जाणून घेण्यात आल्या त्यावर सकारात्मक धोरणे राबविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचे महापालिका प्रशासनाने सांगितले.

# खारफुटी हटविण्यास उच्च न्यायालयाची मंजुरी; वाढवण बंदर प्रकल्पाला वेग

**दैनिक युवक आधार**

**मुंबई,प्रतिनिधी :** वाढवण बंदर प्रकल्पाला एक महत्त्वपूर्ण यश मिळाले असून माननीय मुंबई उच्च न्यायालयाने किनाऱ्यालगतच्या भरण (Near-Shore Reclamation) क्षेत्राच्या प्रवेश मार्गात येणाऱ्या खारफुटी (मॅन्ग्रोव्ह) क्षेत्र हटविण्यास मंजुरी दिली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीसमोरील सर्वात महत्त्वाच्या प्रलंबित अडथळ्यांपैकी एक दूर झाला असून, भारतातील सर्वात मोठ्या ग्रीनफिल्ड बंदर प्रकल्पाच्या कामांना गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.मुंबई उच्च न्यायालयाचा हा निर्णय वाढवण बंदर प्रकल्पाच्या विकासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला असून, त्यामुळे प्रकल्पातील प्रमुख बांधकाम कामांना पूर्ण क्षमतेने सुरुवात करणे शक्य होणार आहे. या मंजुरीमुळे बंदराच्या एकूण पायाभूत सुविधांचा अविभाज्य भाग असलेल्या किनाऱ्यालगतच्या भरण क्षेत्रातील कामांना लक्षणीय वेग मिळण्याची अपेक्षा आहे.

या घडामोडीबाबत प्रतिक्रिया देताना वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (VPPL) चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. गौरव दयाल म्हणाले, "माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दिलेली मंजुरी ही वाढवण बंदर प्रकल्पासाठी मैलाचा दगड



ठरणारी आहे. या महत्त्वाच्या अडथळ्याचे निराकरण आणि विविध कामांच्या आघाड्यांवर झालेली उल्लेखनीय प्रगती यामुळे निर्धारित कालावधीत प्रकल्प पूर्ण करण्याबाबत आमचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. आता प्रकल्पाच्या पूर्ण क्षमतेने अंमलबजावणीच्या नव्या टप्प्यात आपण प्रवेश करत आहोत."

ब्रेकवॉटर आणि किनाऱ्यालगतच्या भरणाशी संबंधित प्रमुख कंत्राटे यापूर्वीच प्रदान करण्यात आली असून, प्रकल्पातील विविध कामांना आता अधिक वेग मिळणार आहे. सेवा रस्त्याच्या (Service Road) बांधकामालाही तातडीने गती मिळण्याची अपेक्षा असून, लवकरच मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष कामे सुरू होणार आहेत. वरोर गावापासून सुरू होणारा हा सेवा रस्ता तवा गावाजवळील मुंबई-अहमदाबाद महामार्गाशी बंदराला जोडणाऱ्या ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गाच्या उभारणीसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. तसेच, महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यात उभारण्यात येणाऱ्या या मेगा बंदराला पश्चिम समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर (DFC) वरील न्यू पालघर स्थानकाशी जोडणाऱ्या १२ किमी लांबीच्या स्वतंत्र रेल्वे जोडमार्गाच्या विकासालाही यामुळे चालना मिळणार आहे.

बंदराच्या रस्ता आणि रेल्वे संपर्क सुविधांसाठी आवश्यक अभियांत्रिकी आणि पूर्वतयारीची कामे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) आणि भारतीय रेल्वे यांनी सुरू केली आहेत. याशिवाय, पाणीपुरवठा पायाभूत सुविधांसाठीची कंत्राटेही देण्यात आली असून, तात्पुरत्या वीजपुरवठ्याची व्यवस्था अंतिम टप्प्यात आहे.

महाराष्ट्र शासन आणि विविध राज्य यंत्रणांच्या सक्रिय सहकार्याने जमीन संपादन प्रक्रियेलाही वेग आला आहे. वैधानिक मंजुरी, संपर्क पायाभूत सुविधा, उपयुक्त सेवा आणि जमीन संपादन या सर्व आघाड्यांवर एकाच वेळी होत असलेली प्रगती विविध यंत्रणांमधील प्रभावी समन्वय अधोरेखित करत असून, प्रकल्पाच्या अंमलबजावणीला अधिक बळकटी देत आहे.

# हातोळण (औरंगपूर) येथे अमृत महोत्सवानिमित्त भव्य हरिकीर्तन सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे** : तालुक्यातील हातोळण (औरंगपूर) येथे मा. श्री. सदाशिव बाबुराव काळोखे (सर) व सौ. सरस्वती सदाशिव काळोखे यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त शनिवार दि. २७ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता भव्य जाहीर हरिकीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक व सांस्कृतिक सोहळ्यास परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या सोहळ्यात प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली कदम (छोटे माऊली) यांचे जाहीर हरिकीर्तन होणार आहे. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, वारकरी संप्रदायातील कीर्तनकार, प्रवचनकार व सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित राहणार आहेत.

गायनाचार्य म्हणून

ह.भ.प. संपत महाराज दानवे

ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली वाबळे

ह.भ.प. योगेश महाराज सूर्यवंशी

ह.भ.प. अजिनाथ महाराज जाधव

संजय महाराज गांगर्डे व संत तुकाराम महाराज वारकरी शिक्षण संस्था, मांदळी

**मृदंगाचार्य**



ह.भ.प. हेमंत महाराज कापडणीस

ह.भ.प. तुषार महाराज गुरव

ओम महाराज गांगर्डे

**प्रमुख उपस्थिती**

मा. आ. बाळासाहेब (काका) आजबे

मा. आ. साहेबराव दरेकर (नाना)

मा. आ. भिमराव धोंडे साहेब

मा. श्री. देविदास (आबा) घस

मा. श्री. सचिनभाऊ जगताप

मा. श्री. सतीश (आबा) शिंदे

मा. श्री. हनुमंतराव थोरवे

मा. श्री. अंकुश आजबे (सर)

मा. श्री. अभिलाष पाटील घिगे

मा. श्री. काकासाहेब शिंदे

मा. श्री. देविदास (काका) जोशी

मा. श्री. बाळासाहेब मेटे

**विशेष उपस्थिती**

श्री. पांडुरंग माढेकर (तात्या), तहसीलदार आष्टी

श्री. गोरेख तरटे साहेब, तालुका कृषी अधिकारी

श्री. हिंगे साहेब, पोलीस उपनिरीक्षक अंभोरा

कार्यक्रमाचे स्वागतकर्ते म्हणून श्री. बलभिम सदाशिव काळोखे, (उपसरपंच हातोळन व लोणी गणप्रमुख राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजितदादा गट)व सौ. अरुणा कारभारी वाघस्कर व सौ. सविता रामकिसन गांगर्डे हे कार्यरत आहेत.


या निमित्ताने बलभिम काळोखे यांच्या वतीने भाविकांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली असून दुपारी १२.१५ वाजल्यापासून ते आपल्या आगमनापर्यंत

अमृत महोत्सव व हरिकीर्तन सोहळ्याच्या माध्यमातून धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक एकोप्याचा संदेश देणारा हा कार्यक्रम ठरणार असून परिसरातील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्व भाविकांनी या सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन समस्त ग्रामस्थ हातोळन (औरंगपूर ) व आयोजकांनी केले आहे.

# विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव द्यावे यासाठी स्वत:च्या रक्ताने लिहिले पत्र

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : दिबा पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लावण्यात यावे यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शेतकरी कामगार पक्षाचे नेते राजेंद्र पाटील यांनी स्वत:च्या रक्ताने पत्र लिहिले आहे. त्यामुळे या पत्राची सर्वत्र चर्चा होत आहे. पनवेल- नवी मुंबई परिसरात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभे राहिले आहे. काही महिन्यांपूर्वी ते सुरू देखील झाले. मात्र अद्याप देखील या विमानतळाचे नामकरण झालेले नाही. येथील प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्रांनी या विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव द्यावे अशी वारंवार मागणी केली. मात्र अद्याप



देखील या विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव देण्यात आलेले नाही. यासाठी अनेक आंदोलने, मोर्चे काढण्यात आली. उपोषण देखील करण्यात आले मात्र शासन दरबारी नावाचे केवळ आश्वासन देण्यात आले. केंद्र शासनाकडून विमानतळाचे नामकरण केले जाईल असे सांगण्यात येत आहे. शेतकरी कामगार पक्षाचे नेते राजेंद्र पाटील यांनी देखील अनेकदा या विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव द्यावे अशी आग्रहाची मागणी केली. 24 जून रोजी दिबा पाटील यांच्या जयंती निमित्ताने राजेंद्र पाटील यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव लावण्यात यावे, यासाठी स्वत:च्या रक्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले आहे. आणि आता तरी दिबा पाटील यांचे नाव विमानतळाला द्यावे अशी मागणी केली.

# सामाजिक परिवर्तनाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज

छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महान किर्तिवंत राजे आणि लोककल्याणकारी समाजसुधारक होते. त्यांनी अस्पृश्यता निवारण, शिक्षण प्रसार आणि आरक्षणाचे जनक म्हणून शाहू महाराज यांच्या जीवनातील अनेक महत्त्वाचे पैलू या लेख रूपात मांडण्याचा प्रयत्न आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव 'यशवंतराव जयसिंगराव घाटगे' असे होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर, त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले आणि त्यांचे नामकरण 'शाहू' असे केले. त्यांनी १८९४ मध्ये कोल्हापूर संस्थानाची छत्रपती महाराज म्हणुन सुत्रे हाती घेतली.

**- सामाजिक सुधारणा आणि आरक्षण-**

शाहू महाराज हे शोषित, वंचित




आणि मागासवर्गीयांचे कैवारी होते. त्यांनी समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागासवर्गीय आणि बहुजन समाजासाठी ५०% आरक्षणाची ऐतिहासिक घोषणा केली. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहाला कायदेशीर मान्यता दिली आणि दलितांना समान हक्क मिळवून दिले.जातिप्रथा नष्ट करण्यासाठी त्यांनी कायदे व जनप्रबोधन धोरण राबवले

**- शिक्षण प्रसार कार्य-**

शाहू महाराजांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून कोल्हापुरात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले. गोरगरीब आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शहरात राहता यावे, म्हणून त्यांनी मराठा, जैन, लिंगायत, मुस्लिम, महार, चांभार अशा विविध जातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू केली. शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या या कार्यामुळेच ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी (AISSMS) च्या वतीने त्यांचा 'दूरदृष्टी असलेले समाजसुधारक' असा गौरव केला जातो.

**- शेती आणि उद्योग विकास कार्य-**

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी १९०७ मध्ये राधानगरी धरणाच्या (लक्ष्मी तलाव) बांधकामाला सुरुवात केली, ज्यामुळे कोल्हापूर सिंचनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा म्हणून त्यांनी शाहुपुरी आणि जयसिंगपूर यांसारख्या मोठ्या बाजारपेठांची निर्मिती केली.

**- कला आणि क्रीडा क्षेत्राला राजाश्रय-**

शाहू महाराजांना कुस्तीची प्रचंड आवड होती. त्यांनी अनेक मल्लांना (पैलवानांना) राजाश्रय दिला, ज्या मुळे कोल्हापूरला 'कुस्तीची पंढरी' म्हणून ओळखले जाऊ लागले. या शिवाय संगीत, नाटक, आणि चित्रकला यांना ही त्यांनी भरघोस मदत करून पाठबळ दिले. शाहू महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य प्रजेच्या कल्याणासाठी आणि सामाजिक न्यायासाठी वेचले. या लोककल्याणकारी कार्यामुळे शाहू महाराजांना कानपूरच्या 'कुर्मी क्षत्रिय सभेने' त्यांना १९१९ मध्ये 'राजर्षी' (राजे + ऋषी) ही पदवी बहाल केली. ६ मे १९२२ रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले. त्यांनी लावलेले समतेचे आणि पुरोगामी विचारांचे रोपटे आज वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. त्यांची जयंती (२६ जून) हा दिवस महाराष्ट्रात 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या १५२ व्या जयंती निमित्त त्यांना विनम्र अभिवादन...

**लेखक**

**डॉ.राजेंद्र मुरलीधर सानप,**

**सदस्य - महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ. इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड, बीड.**

# अमरावतीच्या १०० खाटांच्या माता–बाल संगोपन केंद्रासाठी ३३ कोटींचा निधी तातडीने द्या; आ. सुलभाताई खोडके यांची विधानसभेत जोरदार मागणी

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे अधिवेशन प्रतिनिधी :** अमरावती जिल्ह्यासह ग्रामीण, दुर्गम आणि सीमावर्ती भागातील माता, गरोदर महिला व नवजात बालकांच्या आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी मंजूर असलेल्या १०० खाटांच्या माता-बाल संगोपन केंद्रासाठी (एमसीएच विंग) ३३ कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात यावा, अशी जोरदार मागणी अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली.

पावसाळी अधिवेशनादरम्यान सार्वजनिक आरोग्याशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा आणि निकडीचा विषय सभागृहासमोर मांडताना आ. खोडके यांनी सांगितले की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अमरावती शहरात १०० खाटांचे माता-बाल संगोपन केंद्र उभारण्यास राज्य शासनाने १२ ऑगस्ट २०२४ रोजी ३३ कोटी रुपयांच्या निधीसह प्रशासकीय मान्यता दिली होती. मात्र, प्रशासकीय मान्यतेला जवळपास दोन वर्षांचा कालावधी उलटूनही या प्रकल्पासाठी आवश्यक निधी उपलब्ध न झाल्याने केंद्राचे बांधकाम अद्याप सुरू होऊ शकलेले नाही.



त्यांनी निदर्शनास आणून दिले की, अमरावती हे विभागातील पाच जिल्ह्यांचे प्रमुख केंद्र असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणात रुग्ण उपचारासाठी येतात. विशेषतः महिला आणि बालकांच्या आरोग्यसेवांसाठी या केंद्राची मोठी आवश्यकता आहे. परंतु निधीअभावी प्रकल्प रखडल्याने अमरावतीसह परिसरातील हजारो माता, गरोदर महिला आणि नवजात बालकांना अत्यावश्यक आरोग्य सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे.आ. खोडके यांनी सांगितले की, माता व बालमृत्यू दर कमी करण्यासाठी तसेच अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हे केंद्र अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील महिलांना प्रसूतीपूर्व, प्रसूतीदरम्यान आणि प्रसूतीनंतर आवश्यक उपचार एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे हा प्रकल्प केवळ आरोग्यविषयक सुविधा वाढविणारा नसून माता व बालकांच्या जीविताच्या दृष्टीनेही अत्यंत संवेदनशील आहे.

या पार्श्वभूमीवर शासन आणि सार्वजनिक आरोग्य विभागाने तातडीने हस्तक्षेप करून मंजूर प्रकल्पासाठी आवश्यक ३३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा आणि रखडलेले बांधकाम युद्धपातळीवर सुरू करावे, अशी मागणी त्यांनी सभागृहात केली.

अमरावतीच्या आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणासाठी आणि माता-बाल आरोग्यसेवा अधिक प्रभावी करण्यासाठी हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होणे गरजेचे असल्याचेही आ. सुलभाताई खोडके यांनी यावेळी स्पष्ट केले.

# श्रीवर्धनमध्ये पावसाळ्याची सुरुवात अन् वीज समस्यांना सुरुवात

## १५ तासांच्या खंडित वीजपुरवठ्याने नागरिक त्रस्त

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित :** पावसाळ्याची सुरुवात होताच श्रीवर्धन शहरासह परिसरातील नागरिकांना पुन्हा एकदा खंडित वीजपुरवठ्याचा सामना करावा लागत आहे. पाऊस सुरू होऊन अवघे दोन दिवस झाले नसतानाच श्रीवर्धन शहरातील दांडा परिसर तसेच आजूबाजूच्या भागात तब्बल १५ तासांपेक्षा अधिक काळ वीजपुरवठा खंडित राहिल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.दरवर्षी पावसाळ्यात महावितरणच्या वीजपुरवठ्याबाबत हीच समस्या निर्माण होत असल्याचे चित्र आहे. "पाऊस आला की लाईट गायब" अशी परिस्थिती श्रीवर्धनकरांसाठी नवीन राहिलेली नाही. मुसळधार पाऊस, वाऱ्याचा वेग किंवा किरकोळ तांत्रिक बिघाड झाला तरी अनेक भागांमध्ये तासन्तास



वीज गायब होते. यामुळे नागरिक, व्यापारी, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.दरम्यान, वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा मुद्दाही यानिमित्ताने समोर आला आहे. अनेक वेळा कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा साहित्य, आधुनिक उपकरणे आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरणाचा अभाव असल्याचे दिसून येते. विशेषतः कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पुरेशा सुरक्षा सुविधा मिळतात का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.पावसाळ्यात वीज दुरुस्तीचे काम करताना कर्मचाऱ्यांना मोठा धोका पत्करावा लागतो. अशा परिस्थितीत त्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजना, दर्जेदार सुरक्षा साधने आणि प्रशिक्षण याकडे महावितरण प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.नागरिकांना अखंडित वीजपुरवठा मिळावा तसेच कर्मचाऱ्यांच्या जीवित सुरक्षेची काळजी घेत महावितरणने पावसाळ्यापूर्वीचे नियोजन अधिक प्रभावी करावे, अशी मागणी श्रीवर्धनकरांकडून होत आहे.

वारंवार होणाऱ्या वीज खंडित होण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना कधी होणार, असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.

# अंधाराच्या विळख्यात पुसद नाका उड्डाणपूल; भर पावसात मशालींच्या प्रकाशात संतापाचा ज्वालामुखी !"

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम शहरातील पुसद नाका येथील रेल्वे उड्डाणपूल (ROB) अंधाराच्या विळख्यात अडकला असून या पुलावरील पथदिव्यांच्या अभावामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. अनेक अपघात, जखमी आणि एका महिलेचा मृत्यू झाल्यानंतरही प्रशासनाने गंभीर दखल न घेतल्याने संतप्त सामाजिक कार्यकर्त्यांनी भर पावसात मशाली पेटवून जोरदार आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

पुसद नाका उड्डाणपूल पूर्ण होऊन बराच कालावधी लोटला असला तरी आजपर्यंत या पुलावर पथदिव्यांची व्यवस्था करण्यात आलेली नाही. परिणामी रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर अंधारमय होत असून वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना




करावा लागत आहे. हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग NH-161E शी जोडलेला असून रेल्वे रुळांवरून जाणारा महत्त्वाचा रोड ओव्हर ब्रिज (ROB) आहे. त्यामुळे या पुलावरील सुरक्षितता अधिक महत्त्वाची ठरते.

सामाजिक कार्यकर्त्यांनी सांगितले की, MORTH व IRS यांच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये अशा उड्डाणपुलांवर प्रकाशयोजनेची स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. मात्र संबंधित विभागांच्या उदासीनतेमुळे या नियमांची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करण्यात आला. पुलावरील अंधारामुळे यापूर्वी अनेक अपघात घडले असून एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तसेच नुकत्याच झालेल्या भीषण अपघातात तब्बल १२ जण जखमी झाले होते. या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या तीन वर्षांपासून विविध प्रशासकीय विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याची खंत आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. प्रत्येक विभाग जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करीत असून जनतेच्या सुरक्षेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करण्यात आला.भरधाव वाहनांच्या आवाजात आणि कोसळणाऱ्या पावसात पेटलेल्या मशालींनी प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधातील संतापाला जणू आवाज दिला.

**"अपघातानंतर जाग येणार की आणखी बळी गेल्यानंतर?"**

**पुसद नाका उड्डाणपुलावरील अंधारामुळे दररोज हजारो वाहनचालक जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. प्रशासनाने तातडीने पथदिव्यांची व्यवस्था करून नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, अशी जोरदार मागणी आता सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे.**

या आंदोलनाद्वारे नागरिकांच्या जीवित सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणण्यात आला.

सामाजिक कार्यकर्ते अजय मोतीवार यांनी इशारा देताना सांगितले की, "पुसद नाका उड्डाणपुलावर तात्काळ पथदिवे बसविण्यात यावेत. अन्यथा नागरिकांच्या मनातील संताप अनावर होईल. प्रशासनाने यापुढेही दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल."

या आंदोलनात प्रतीक कांबळे, संध्या सभादिंडे, सखुबाई बनसोड, ताजु ठेकेदार, कुणाल लंके, मंगेश वानखेडे, किसनराव धोटे, नरेश येल्लारे, शुभम भडके, इम्रान शेख, संजय सावंत, प्रवीण बनसोड, राजू शिराळ यांच्यासह अनेक नागरिक सहभागी झाले होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त २१ ते २३ जुलै दरम्यान तीन दिवसीय 'महाराजस्व अभियान'

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात २१, २२ आणि २३ जुलै या कालावधीत तीन दिवसीय 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' राबविण्यात येणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने या अभियानाचे नियोजन करण्यात आले असून, राज्यातील तब्बल ५० लाख कुटुंबांपर्यंत महसूल विभागाच्या विविध सेवा, शासकीय योजना आणि नागरिकाभिमुख उपक्रम पोहोचविण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.



या अभियानांतर्गत राज्यातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांमध्ये विशेष शिबिरे, जनजागृती उपक्रम आणि नागरिक सेवा केंद्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. जमीन मोजणी, सातबारा व फेरफार प्रकरणांचा निपटारा, उत्पन्न, जात व रहिवासी दाखल्यांचे वितरण, विविध महसुली प्रकरणांचे तातडीने निराकरण, शेतकऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन, शासनाच्या विविध योजनांची माहिती तसेच लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महसूल विभागाने व्यापक नियोजन केले असून, जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवरील यंत्रणेला जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. प्रत्येक मतदारसंघात लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि महसूल अधिकारी यांच्या समन्वयातून नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे.

या अभियानाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत राज्यातील सहाही विभागांचे विभागीय आयुक्त, महाराजस्व अभियान अंमलबजावणी समितीचे प्रमुख विक्रांत पाटील, समितीच्या सदस्य नीलम गोऱ्हे आणि मनीषा कायंदे यांच्यासह वरिष्ठ महसूल अधिकारी उपस्थित होते. बैठकीत अभियानाची रूपरेषा, सेवा वितरणाची कार्यपद्धती, जनसहभाग वाढविण्याच्या उपाययोजना आणि विभागनिहाय नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभियान प्रभावी, पारदर्शक आणि लोकाभिमुख पद्धतीने राबविण्याच्या सूचना देत, नागरिकांना शासकीय कार्यालयांचे वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत यासाठी सेवा त्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश दिले. राज्यभरातील महसूल यंत्रणा या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सज्ज असून, मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रकल्पग्रस्त ग्रामविकास सामाजिक संस्थेचे लाक्षणिक उपोषण संपन्न, मागण्यांवर वेळेत होणार कार्यवाही

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** प्रकल्पग्रस्त ग्रामविकास सामाजिक संस्थेने गुरुवार 25 जून रोजी नैना कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण केले. यावेळी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांवर वेळेत कार्यवाही होणार असल्याचे लेखी पत्र उपोषणकर्त्यांना देण्यात आले. स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या एक दिवसीय उपोषणाची नैना प्रशासनाने एका तासात दखल घेतली आणि सर्व मागण्या मान्य करून त्या वेळेत पूर्ण करू अशी टाईम लाईन देण्यात आली. त्यामुळे हे उपोषण स्थगित करण्यात आले. यावेळी अध्यक्ष रामचंद्र भगत, श्याम पाटील, प्रज्ञेश कांबळे, सरपंच नितीन भगत, माजी सरपंच एड. विजय भगत, दीपक घाडगे, विनायक भगत, संदीप भगत, देवयानी भगत, शुभांगी झावरे, मनोज भगत, मच्छिंद्र पाटील. जयवंत भगत, अभय गोंधळी, जयदास चौधरी यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.



येथील गावांमध्ये नैना विरोधात प्रचंड असंतोष आहे. त्याचा उद्रेक झाल्यास नैनाच्या अधिकाऱ्यांना पळता भुई थोडी होणार आहे. नैनाविरोधात उपोषण करण्यात येणार असल्याने या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला होता. उपोषणाला सुरुवात केल्यानंतर काही वेळातच सिडको-नैनाने हे उपोषण थांबवण्यास सांगितले आणि उपोषणकर्त्यांना पत्र दिले. या पत्रात टीपीएस सातमधील नकाशात योग्य ते फेरबदल करण्यात आलेले असून एकत्रित नकाशा शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्तावित असल्याचे सांगितले तसेच अंतिम भूखंड ताबा देण्याबाबत कार्यप्रणाली लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल. पनवेल कर्जत कॉर्ड रेल्वे लाईनचा कोऑर्डिनट असलेला नकाशा रेल्वे कडून प्राप्त न झाल्याने भूखंडाच्या हद्दीबाबत सिडको महामंडळाला ही स्पष्टता नाही, या विषयाबाबत मध्य रेल्वे विभागाला पाठवलेले पत्र सोबत जोडण्यात आले. जे भूखंड जमीन धारकांच्या विनंतीमुळे होणाऱ्या फेरबदलामुळे बाधित होत नाही त्या भूखंडाशी संबंधित आवश्यक कागदपत्रांचा समावेश असलेली नास्ति भूखंडाचा ताबा दिल्यानंतर आठ दिवसात उपलब्ध करून दिली जाईल.

ऊसर्ली खुर्द गावाचे कोऑर्डीनेट दहा दिवसात संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. इमारत बांधकाम परवानगी मिळण्यासाठी विमानतळ प्राधिकरणाकडून ब्लॅंकेट एनओसी बाबतचा विषय विचाराधीन आहे तसेच री डेव्हलपमेंट बाबत युडीसीपीआरमधील तरतुदीनुसार कार्यवाही करून प्रस्ताव व्यवस्थापनेच्या मान्यतेस्तव तयार करण्यात आला आहे. विकास परवानगी पूर्णतः ऑनलाइन प्रक्रियेद्वारे देण्याची कार्यवाही सुरू आहे तसेच भूखंड विभाजनाकरताचे धोरण तयार करून सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने त्यावर कार्यवाही करण्यात येईल. असे पत्र उपोषणकर्त्यांना देण्यात आले.

# रूमचा ताबा न देता रूमची दुसऱ्याला केली विक्री

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** रूमचा ताबा न घेता रूम परस्पर दुसऱ्या इसमास विक्री करून फसवणूक केल्याप्रकरणी जन्नत एंटरप्राईजेस चे मालक अर्शद कुरेशी आणि मेहनाज कुरेशी (राहणार सेक्टर 34 ए खारघर) यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात 23 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी श्रीप्रकाश मिश्रा हे दहिसर ईस्ट मुंबई, भोईर नगर येथे राहत असून 2015 ते 2026 पर्यंत जन्नत एंटरप्राईजेसचे मालक अर्शद कुरेशी आणि मेहनाज कुरेशी यांनी रूमसाठी त्यांच्याकडून 63 लाख रुपये घेतले.

त्या रूमची सह दुय्यम निबंधक क्रमांक तीन, पनवेल या रजिस्ट्रेशन कार्यालय येथे रजिस्ट्रेशन करून दिले. मात्र रूमचा ताबा त्यांना दिला नाही.

रूमसाठी घेतलेली रक्कम परत न करता ती रूम परस्पर दुसऱ्या इसमाला विक्री करून मिश्रा यांची फसवणूक केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# रिक्षातून खेचून केली मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** चालकाला रिक्षातून खेचून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली आणि लाकडी काठीने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी आरोपी प्रशांत दिनकर कदम (राहणार कल्हेगाव)याच्या विरोधात 24 जून रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी योगेश पाटणे हे जरी मरी मंदिर, कल्हेगाव येथे राहत असून ते रिक्षा



चालवतात. 23 जून रोजी आरोपी प्रशांत कदम आणि त्याचा अनोळखी मित्र यांनी योगेश यांना रिक्षातून खेचून लाथबुक्याने मारहाण केली आणि प्रशांत कदम यांनी लाकडी काठीने मारहाण करून त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक, सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सिल्लोडमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम 'अमृत कुटुंब संवाद'चा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : छत्रपती संभाजीनगर :-कुटुंबातील संवाद वाढविणे, भारतीय संस्कृतीची मूल्ये जपणे आणि नव्या पिढीवर संस्कार घडविणे या उद्देशाने सिल्लोड तालुक्यात महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था 'अमृत' (AMRUT) यांच्या वतीने 'अमृत कुटुंब संवाद' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्था अमृतच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांच्या संकल्पनेतून व राज्य व्यवस्थापक दीपक जोशी, मराठवाडा विभाग प्रमुख अमित सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा उपव्यवस्थापक (अमृत) छत्रपती संभाजीनगर योगेश रोडे यांनी या मोहिमेची सुरुवात केली. सध्याच्या डिजिटल युगात कुटुंबातील सदस्यांमधील संवाद कमी होत असल्याने, तो पुन्हा वाढविणे आणि कुटुंबव्यवस्था अधिक सक्षम करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.या उपक्रमांतर्गत 'आजी-आजोबा संवाद कट्टा', एकत्रित प्रार्थना व वाचन, मातृ-पितृ वंदन दिवस , मोबाईलमुक्त कुटुंब व पारंपरिक खेळ, आरोग्य व योग सत्र, भारतीय सण-परंपरांची माहिती, समाजसेवा व कौशल्य विकास उपक्रम तसेच 'माझे कुटुंब – माझा अभिमान' या उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

**"आजच्या धावपळीच्या जीवनात कुटुंबातील संवाद कमी होत चालला आहे. 'अमृत कुटुंब संवाद' या उपक्रमातून कुटुंबातील सर्व सदस्यांना एकत्र आणून संस्कार, संवाद आणि स्नेह वाढविण्याचा प्रयत्न आहे. सुसंस्कृत कुटुंबातूनच सुदृढ समाज आणि सक्षम राष्ट्राची निर्मिती होईल."**

**— दीपक जोशी, राज्य व्यवस्थापक, अमृत**

याबाबत बोलताना जिल्हा उपव्यवस्थापक योगेश रोडे म्हणाले, "कुटुंब हा समाजाचा पाया आहे. कुटुंबातील सुसंवाद आणि संस्कार यांमधूनच सुदृढ समाजाची निर्मिती होते. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाने या उपक्रमात सहभागी होऊन आपल्या घरातूनच या अभियानाची सुरुवात करावी."

# अकोला जिल्ह्यात जोरदार पावसाचे आगमन !! कापूस लागवडीसह पेरणीला वेग, शेतकरी सुखावला !

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर अकोला जिल्ह्यात जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. या दमदार पावसामुळे बळीराजा सुखावला असून, जिल्ह्यातील शेतीकामांना कमालीचा वेग आला आहे. अनेक भागांत शेतकऱ्यांनी रखडलेल्या पेरण्यांना आणि कापूस लागवडीला जोमाने सुरुवात केली आहे.



पावसाची दमदार हजेरी लागल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण आहे,

मृग नक्षत्र सुरू होऊनही पावसाने दडी मारल्यामुळे शेतकरी चिंतेत होता. मात्र मंगळवार पासून सुरू झालेल्या दमदार पावसामुळे जमिनीला आवश्यक असलेला ओलावा मिळाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान पाहायला मिळत असून, पेरणीयोग्य पाऊस झाल्याने खरीप हंगामातील कामांची लगबग वाढली आहे.

कापूस लागवड आणि पेरणीला सुरुवात झाली आहे, जिल्ह्यात प्रामुख्याने कापूस आणि सोयाबीन ही मुख्य पिके घेतली जातात. पाऊस पडताच शेतकऱ्यांनी कापूस लागवडीला प्राधान्य दिले आहे, तसेच इतर पिकांची पेरणीही मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहे. कृषी विभागाकडूनही शेतकऱ्यांना योग्य ओलावा तपासूनच पेरणी करण्याचा सल्ला दिला जात आहे. पावसाने वेळेवर सुरुवात केल्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली आहे. आता फक्त पावसाने पुन्हा लांब दडी मारू नये , जर पावसाने असाच नियमित दिलासा दिला, तर जिल्ह्यातील सर्व पेरण्या यशस्वी होतील आणि यंदाचे पीक उत्तम येईल.

**सातपुड्याच्या पायथ्याशी जोरदार पाऊस :**

**निसर्गाच्या कुशीत वसलेल्या सातपुडा पर्वतभागाच्या पायथ्याशी मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. या दमदार पावसामुळे परिसरातील वातावरण अगदी प्रसन्न आणि आल्हाददायक झाले आहे.डोंगरावरून वाहून येणाऱ्या पाण्यामुळे पायथ्याशी असलेल्या नद्या, नाले आणि ओढे ओसंडून वहात आहेत. मृग नक्षत्राच्या या काळात झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकरी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण असून, पेरणीच्या कामांना वेग आला आहे.**

पावसाच्या सातत्यावर सर्व काही अवलंबून आहे, कृषी तज्ज्ञांच्या मते, सुरुवातीचा हा पाऊस पिकांसाठी अत्यंत पोषक आहे. मात्र पेरलेले बी व्यवस्थित रुजण्यासाठी आणि पिकांच्या पुढील वाढीसाठी पावसाने सातत्य राखणे गरजेचे आहे. जर पावसाने दडी मारली नाही, तर अकोला जिल्ह्यात यंदा विक्रमी पेरणी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# ४० राईस मिलर्सवर कारवाईची तलवार

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : खरीप हंगामातील सरकारी धान खरेदी प्रक्रियेत मोठा आर्थिक घोटाळा समोर आला. जिल्ह्यातील ४० राईस मिलर्सवर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली. कागदावर धानाची अधिक मिलिंग दाखवून शासनाची फसवणूक करणाऱ्या या मिलर्समुळे जिल्ह्यात खळबळ उडाली.

जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालयाने केलेल्या तपासणीत धक्कादायक माहिती समोर आली. शेतकऱ्यांकडून खरेदी केलेले धान मिलिंगसाठी विविध खाजगी राईस मिलमध्ये पाठवण्यात आले होते. मात्र, काही मिलर्सनी पोर्टलवर प्रत्यक्ष मिलिंगपेक्षा अधिक धानाची मिलिंग झाल्याचे चुकीचे आकडे नोंदवले.

या घोटाळ्याचा पर्दाफाश महावितरणच्या वीज मीटरच्या आकडेवारीवरून झाला. मार्केटिंग फेडरेशनची ऑनलाइन प्रणाली आणि महावितरणच्या वीज वापराचे आकडे यांचा ताळमेळ घातला असता, त्यात मोठी तफावत दिसून आली.

नियमानुसार, जेवढ्या धानाची मिलिंग झाली, तेवढा वीज वापर होणे अपेक्षित होते. परंतु, नोंदवलेल्या मिलिंगच्या तुलनेत प्रत्यक्षात झालेला वीज वापर अत्यंत कमी असल्याचे दिसून आले. या विसंगतीमुळे जिल्ह्यातील २०७ पैकी ४० राईस मिलर्स संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

**शेतकरी संघटना आक्रमक**

धान मिलिंगमधील या अनियमिततेमुळे सरकारी तिजोरीचे नुकसान झाले असून, त्याचा फटका अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांना बसत आहे. यामुळे संतप्त शेतकरी संघटनांनी या दोषी मिलर्सवर केवळ दंडात्मक कारवाई न करता, त्यांना भविष्यातील सरकारी कामांतून कायमचे 'ब्लॅकलिस्ट' करावे, अशी मागणी लावून धरली. या प्रकारामुळे धान खरेदी आणि मिलिंग प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासन या मिलर्सवर नेमकी काय कारवाई करते आणि भविष्यात ही प्रक्रिया कशी सुधारते? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

**प्रशासनाची भूमिका, कारवाईची तयारी**

या प्रकरणाबाबत जिल्हा मार्केटिंग अधिकारी सुधीर पाटील यांनी माहिती दिली की, खरीप हंगामातील (ऑक्टोबर) या अनियमिततेबाबतची सविस्तर अहवाल मार्केटिंग फेडरेशनच्या वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यात आला. वरिष्ठ स्तरावरून निर्देश प्राप्त होताच संबंधित दोषी मिलर्सवर कठोर दंडात्मक कारवाई केली.

# मूल्याधारित शिक्षणासाठी हेमोत्सव चे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** नवीन शिक्षण धोरण अंतर्गत मूल्याधारित शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी कार्यरत असलेल्या हेमा फाउंडेशनतर्फे 'हेमोत्सव २०२६ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन २७ जून रोजी सायंकाळी ५ वाजता दादर येथील योगी सभागृहात करण्यात आले आहे.

संस्थेचे मार्गदर्शक महेंद्र काबरा यांच्या नेतृत्वाखाली तसेच जागतिक ख्यातनाम मानसशास्त्रज्ञ आणि फीलिंग माइंड्सच्या संस्थापक डॉ. चिनू अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली 'हेम व्हर्च्यूज' ई-लर्निंग पोर्टलद्वारे मूल्याधारित शिक्षणाचा व्यापक प्रसार करण्यात येत आहे.



यावेळी 'हेमश्री', 'हेम सारथी' आणि 'हेम चॅम्पियन' हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. कार्यक्रमाला खासदार सुधांशू त्रिवेदी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच कॅबिनेट मंत्री आशीष शेलार, आमदार संजय उपाध्याय, मुंबईच्या महापौर तावडे, आमदार अमित साटम आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू रवींद्र कुलकर्णी हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# बारवर कारवाई, 14 जणांविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेल शहर पोलिसांनी पिके मुन नाईट बार अँड रेस्टॉरंटवर छापा टाकत महिला वेटर, कॅशियर, मॅनेजर आणि तीन पुरुष वेटर अशा 14 जणांविरोधात 23 जून रोजी गुन्हा दाखल केला.22 जून रोजी रात्री अकराच्या सुमारास पिके मुन नाईट बार अँड रेस्टॉरंट, पळस्पे गाव येथे सात महिला ठेवणे बंधनकारक असताना सात पेक्षा जास्त महिला दिसून आल्या आणि या महिलांनी नियमांचे उल्लंघन केले. या महिलांनी मद्यपान गृह, उपहारगृह येथे नृत्य करण्यास मनाई असतानाही तोकडे कपडे परिधान करून ग्राहकांशी अंगाशी लगट केले, तसेच अंग विक्षिप्त, अश्लील कृत्य करून नृत्य करताना दिसून आल्या. तसेच बारमधील मॅनेजर अजय अयोध्या पास्वान आणि पिंटूकुमार यादव, संजय साकेत, प्रकाश त्रिपाठी, अरविंद यादव यांच्यासह बारमधील नऊ महिला वेटर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# ओबीसी संघर्ष समितीच्या बेमुदत साखळी उपोषणाला भारतीय बौद्ध परिषद कनेरी/दगडीचे समर्थन

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे भंडारा :** ओबीसी समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सुरू असलेल्या ओबीसी संघर्ष समिती, जिल्हा भंडारा यांच्या बेमुदत साखळी उपोषणाला भारतीय बौद्ध परिषद सर्कल कनेरी/दगडी यांच्या शिष्टमंडळाने भेट देत जाहीर समर्थन व्यक्त केले.

या प्रसंगी भारतीय बौद्ध परिषद सर्कल कनेरी/दगडीचे प्रभारी अध्यक्ष जयेंद्र देशपांडे यांनी उपोषणस्थळी उपस्थित राहून आंदोलनकर्त्यांची सदिच्छा भेट घेतली. त्यांनी ओबीसी समाजाच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा दर्शवत शासनाने या प्रश्नांची तात्काळ दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.

जयेंद्र देशपांडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "समाजातील वंचित, उपेक्षित घटकांच्या हक्कांसाठी उभारलेला




हा लढा केवळ ओबीसी समाजापुरता मर्यादित नसून सामाजिक न्यायाच्या व्यापक तत्त्वाशी निगडित आहे. शासनाने आंदोलनकर्त्यांच्या भावना समजून घेऊन त्वरित तोडगा काढावा."

यावेळी शिष्टमंडळातील सदस्यांनी उपोषणकर्त्यांशी चर्चा करून त्यांच्या मागण्यांची माहिती घेतली व संघर्ष समितीच्या आंदोलनाला पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली. उपोषणस्थळी सामाजिक न्याय, संविधानिक हक्क आणि समाजातील विविध घटकांच्या एकजुटीचा संदेश देण्यात आला.

भारतीय बौद्ध परिषद कनेरी/दगडीच्या या भेटीमुळे आंदोलनकर्त्यांचा उत्साह वाढला असून विविध सामाजिक संघटना आता या आंदोलनाच्या समर्थनार्थ पुढे येत असल्याचे चित्र दिसून येत आहे. ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी सुरू असलेल्या या लढ्याला दीड महिन्याच्या उपोषणास दिवसेंदिवस व्यापक जनसमर्थन मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## शुभविवाहास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे – श्री. विजय कोकाटे

# चि.सौ.का. प्रिती व चि. रविंद्र यांचा शनिवार, दि. २७ जून रोजी अहिल्यानगर येथे भव्य शुभविवाह सोहळा

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**
**बाळासाहेब रक्ताटे**




सुसंस्कृत, सुशिक्षित आणि प्रतिष्ठित कुटुंबांना पवित्र वैवाहिक बंधनात जोडणारा चि.सौ.का. प्रिती विजय कोकाटे आणि चि. रविंद्र बबन बोरुडे यांचा शुभविवाह सोहळा शनिवार, दि. २७ जून २०२६ रोजी अहिल्यानगर येथे मोठ्या उत्साहात व मंगलमय वातावरणात संपन्न होणार आहे. या विवाह सोहळ्यामुळे कोकाटे व बोरुडे परिवारासह नातेवाईक, मित्रपरिवार आणि शुभचिंतकांमध्ये आनंदांचे वातावरण निर्माण झाले आहे.

चि.सौ.का. प्रिती या सौ. अंबुबाई व श्री. विजय भाऊराव कोकाटे, रा. चिचोंडी पाटील, ता. जि. अहिल्यानगर यांच्या ज्येष्ठ कन्या आहेत. त्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात संगणक सॉफ्टवेअर विकासक म्हणून कार्यरत असून आपल्या कर्तुत्वांने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे, शिक्षण, संस्कार आणि व्यावसायिक प्रगती यांचा उत्कृष्ट समन्वय साधत त्यांनी आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

तर चि. रविंद्र बबन बोरुडे हे सौ. पुष्पा व श्री. बबन आश्रुबा बोरुडे, रा. कोकणगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर यांचे कनिष्ठ चिरंजीव आहेत. ते गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत असून ग्रामीण विकास, प्रभावी प्रशासन आणि लोकाभिमुख कार्यशैलीमुळे त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. शासकीय सेवेत प्रामाणिकपणे कार्य करत असताना समाजाशी जपलेले त्यांचे जिव्हाळ्याचे नाते सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरत आहे.

या नवदांपत्याचा शुभविवाह निज ज्येष्ठ शुद्ध १३, शके १९४८, शनिवार, दि. २७ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजुन ३८ मिनिटांच्या अभिजित मुहूर्तावर संपन्न होणार आहे. विवाह सोहळ्याचे आयोजन खुशी लॉन्स, दूधसागर, अरुणगाव रोड, केडगाव, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे.

विवाहपूर्व पारंपरिक हळदी समारंभ शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता याच ठिकाणी आयोजित करण्यात आला असून या समारंभात कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्रपरिवारांच्या उपस्थितीत विविध पारंपरिक कार्यक्रम पार पडणार आहेत. त्यामुळे विवाह सोहळ्यांची रंगत अधिक वाढणार आहे.

कोकाटे आणि बोरुडे परिवार हे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे कुटुंब म्हणून परिचित आहेत. त्यामुळे या शुभविवाह सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, शासकीय अधिकारी, उद्योजक, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले.

विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा नव्हे, तर दोन कुटुंबांच्या भावनिक नात्यांचा पवित्र मिलाफ असतो. संस्कार, परंपरा, प्रेम आणि परस्पर विश्वास यांच्या भक्कम पायावर सुरु होणाऱ्या या नव्या जीवनप्रवासासाठी नवदांपत्यावर सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. उपस्थित मान्यवरांच्या शुभाशीर्वादाने आणि आप्तस्वकीयांच्या प्रेमळ सहवासाने हा विवाह सोहळा संस्मरणीय ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

यावेळी आदर्श शिक्षक श्री. विजय कोकाटे यांनी सर्व आप्तेष्ट, नातेवाईक, मित्रपरिवार, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार, अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व शुभचिंतकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून नवदांपत्यास शुभाशीर्वाद देण्यांचे सस्नेह आवाहन केले आहे.

# काँग्रेस प्रवक्ता हनुमंत पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत व जिल्हाध्यक्ष डॉ. श्रुती म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली SIR पनवेल विधानसभा (BLA2) प्रशिक्षण शिबिर आयोजित

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील काँग्रेस पक्ष नव्या जोमाने संघटनात्मक बांधणीसाठी कार्यरत असून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत काँग्रेसची विचारधारा आणि पक्ष संघटना पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. सामान्य कार्यकर्त्यांना बळ देणे, त्यांच्याशी सातत्याने संवाद साधणे आणि रात्रंदिवस उपलब्ध राहून त्यांच्या अडचणी सोडविणारे प्रदेशाध्यक्ष अशी त्यांची ओळख राज्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे.

त्याच अनुषंगाने, डॉ. श्रुती श्याम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अधिकृत पनवेल विधानसभा १८८ BLA-1 यंत्रणेमार्फत BLA-2 प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, दि. २७ जून २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे संपन्न होणार आहे.




या प्रशिक्षण शिबिरात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते श्री. हनुमंत पवार, SIR प्रशिक्षक ॲड. अरविंद कुमार द्विवेदी तसेच पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक श्री. हरीश केणी हे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.प्रशिक्षणामध्ये मतदार यादीतील नावांची पडताळणी, नवीन मतदार नोंदणी, नावांमधील दुरुस्ती, मतदानाचा हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना, BLA-2 ची जबाबदारी, बूथ व्यवस्थापन तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

डॉ. श्रुती श्याम म्हात्रे यांनी सांगितले की, पनवेल विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक बूथ सक्षम करणे, प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा हक्क मिळवून देणे आणि लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अधिकृत BLA-1 टीमच्या माध्यमातून बूथ स्तरावर संघटन अधिक बळकट करण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाला नगरसेवक हरीश केणी, कार्याध्यक्ष शशिकला सिंग, उपाध्यक्ष चेतन म्हात्रे,अमित दवे, विलास म्हात्रे, जयवंत देशमुख, कॅप्टन. कलावत,सोनटक्के सर, डॉ.विजयकुमार चव्हाण, जोश जेम्स ,प्रदीप सुनखे, कुलदीप नेटके, स्वप्निल पवार, अभिजीत मुंडक्कल, सायरा मॅडम, सोनिया मॅडम यांच्यासह महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, NSUI, सेवा दल, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, बूथ अध्यक्ष ,लोकशाही मानणाऱ्या विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने सर्व नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या महत्त्वपूर्ण प्रशिक्षण शिबिरात सहभागी होऊन लोकशाही बळकट करण्याच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# धामणगावमध्ये उडीद पिकाचे बनावट बियाणे जप्त

## कृषी विभागाच्या भरारी पथकाने 115 बॅग पाटला करून जप्त केल्या

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे** : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बाजारात बनावट बियाणे विक्री करणाऱ्यांचे भांडे कृषी विभागाच्या भरारी पथकाने पाठलाग करून फोडले. आष्टी तालुक्यातील धामणगाव येथे केलेल्या कारवाई ११५ किलो उडीदाचे बनावट बियाणे जप्त केले असून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार आष्टी तालुक्यातील धामणगाव येथे शिवशंभो कृषी सेवा केंद्राचे भूषण बेलाजी बोराडे हे निर्मल सिड्स कंपनीचे उडीद पिकाचे बनावट बियाणे विकत असल्याची गोपनीय माहिती कृषी विभागाला मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला. त्यानुसार भरारी पथकाने बोराडे याच्या गाडीचा पाठलाग केला. यावेळी पळून जाण्याचा प्रयत्न होत असताना झटापट करून गाडीतून बियाणे जप्त केले. या कारवाईत ११५ किलो (२३) बॅग) उडीद बियाणे जप्त करण्यात आले.

राज्याचे कृषी संचालक (निवगुनि) सुनील बोरकर, कृषी संचालक (निवगुनि) सुनील वानखेडे, छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे, मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी प्रवीण देशमुख, बीडचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी साहिल सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे बोगसगिरी करणाऱ्या कृषी विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

आष्टी तालुक्यातील निमगाव चोभा येथील विक्रेत्याला उडदाचे बनावट बियाणे विकल्याचे दिसून आले. त्यानंतर धामणगाव येथील विक्रेत्यावर कृषी विभागाच्या पथकाने कारवाई केली.

**विनापरवाना, बनावट बियाणे प्रकरणी गुन्हा दाखल**

उडीद बियाणे वाण NUL-7 (विश्वास) हे बनावट दिसून आल्याने तपासणीत विक्रेत्याने गंभीर नियमभंग केल्याचे स्पष्ट झाले.

विनापरवाना, बनावट बियाणे प्रकरणी आष्टी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) नागसेन शिंदे यांच्या तक्रारीवरून आष्टी पोलिस ठाण्यात २३ जून रोजी अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, बियाणे नियंत्रण आदेश १९८३, बियाणे कायदा १९६६, भारतीय न्याय संहिता २०२३ कायद्यांतर्गत धामणगाव येथील भूषण बेलाजी बोराडे यांच्याविरुद्ध आष्टी ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.




**'या' पथकाने केली कारवाई**

जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी सयाप्पा गरांडे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक वल्लभ भोसले, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, कृषी अधिकारी (गु.नि) तालुका कृषी अधिकारी आष्टीचे नागसेन शिंदे यांनी ही कारवाई केली. त्याआधी बियाणांच्या सत्यतेबाबत निर्मल सिड्सचे रिजनल मॅनेजर यू. बी. बळे यांच्याकडून नियमानुसार खात्री केली. मूळ पाकिटावर साथी पोर्टल सीड स्ट्रेस्याबिलिटी दिसून येते, तर बनावट पाकिटावर ती दिसून आली नाही. मूळ व बनावट पाकिटातील अक्षरांमध्येही तफावत आढळून आली.

**निमगाव चोभा येथील कृषी केंद्राला विकले बियाणे**

धामणगाव येथील शिवशंभो कृषी सेवा केंद्राच्या विक्रेत्याने निमगाव चोंभा येथील कानिफनाथ कृषी सेवा केंद्राला निर्मल सिड्सचे उडीद बियाणांचे २४ पाकिटे विकली होती. त्याचे बिल हस्तगत करण्यात आले.

तसेच धिरडी येथील शेतकरी भगवान जाधव यांच्याकडून त्यांनी खरेदी केलेले बियाणे कृषी विभागाच्या भरारी पथकाने हस्तगत केली. त्यानंतर विविध कलमांनुसार कायदेशीर फिर्याद देत कारवाई केली.

---

## ग्रंथालय चळवळीचे जनक स्वर्गीय पी.एन.पणिक्कर यांच्या स्मरणार्थ 'राष्ट्रीय वाचन दिन' उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) बीड** - पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या ग्रंथालय विभागाच्यावतीने दिनांक १९ जून २०२६ रोजी स्वर्गीय पी.एन.पणिक्कर यांच्या स्मरणार्थ 'राष्ट्रीय वाचन दिन' मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या वेळी केरळ मधील ग्रंथालय चळवळीचे जनक स्वर्गीय पी.एन.पणिक्कर यांना अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय वाचन दिना निमित्त महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्या वतीने अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अपेक्स इंग्लिश स्कुलचे अध्यक्ष आदरणीय हुसेन भाई मकरानी तसेच श्री.शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य




महाविद्यालय, शिवाजीनगर गढी येथील प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते. व्यासपिठावर अंतर्गत मुल्यमापन हमी कक्षाचे प्रमुख प्रा.विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. या वेळी महाविद्यालयाच्या ग्रंथपाल प्रा.ज्योती रकटे यांनी प्रास्ताविकामध्ये १९ जून हा दिवस केरळ मधील ग्रंथालय चळवळीचे जनक स्वर्गीय पी.एन.पणिक्कर यांच्या स्मरणार्थ 'राष्ट्रीय वाचन दिन' म्हणून संपूर्ण देशात साजरा केला जातो असे सांगितले. मुलांची शिक्षणामध्ये आवड निर्माण व्हावी हा या अभियाना मागचा उद्देश आहे असे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे हुसेन भाई मकरानी म्हणाले की, एखादे पुस्तके एखाद्याच्या आयुष्याला कलाटणी देऊ शकते तसेच एक पान एखाद्याचे आयुष्य बदलू शकतं असे मत मांडले. तर दुसरे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.विश्वास कदम म्हणाले की, पुस्तके मुलांना चांगले संस्कार देतात, पुस्तके युवकांना दिशा देतात आणि वृद्धांना आधार देतात'. अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे म्हणाले की, वाचनसंस्कृती ही आजच्या काळाची गरज आहे. एक चांगले पुस्तक १०० मित्रांप्रमाणे असते. म्हणून लहानपणीच वाचनाची गोडी लागली की आपोआप काही गुण आपल्या अंगी येऊ लागतात. तेव्हा 'रोज एक तरी पान वाचत चला' हा संदेश या कार्यक्रमाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न ग्रंथालय विभागाच्या वतीने केला गेला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.बंडू लोखंडे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.वंदन जाधव यांनी मानले.

या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला.

---

## राज्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना लागू असलेल्या "बल्क ग्राहक" डिझेल वर्गीकरणात बदल करणेबाबत आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांचा तारांकित प्रश्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** राज्यातील मुंबईसह कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यांतील मच्छिमारांचे उपजीविकेचे मुख्य साधन असलेल्या मत्स्यव्यवसायासंदर्भात महत्त्वाचा मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला. राज्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना लागू असलेल्या "बल्क ग्राहक" डिझेल वर्गीकरणात बदल करण्याचीही मागणी त्यांनी या तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून केली. या प्रश्नामध्ये मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना "बल्क ग्राहक" म्हणून वर्गीकृत केल्यामुळे त्यांना उच्च दराने डिझेल खरेदी करावे लागत असल्याने मच्छिमारांवर मोठा आर्थिक बोजा पडत असल्याचा मुद्दा मांडण्यात आला आहे. उरण तालुक्यातील मोरा व करंजा बंदरातील पर्ससीन नेट व खोल समुद्रातील मासेमारी करणाऱ्या सुमारे ३०० बोटींच्या संचालनासाठी मोठ्या प्रमाणात डिझेलची गरज भासत असून, दरवाढीमुळे मासेमारी व्यवसायावर गंभीर परिणाम झाल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच डिझेल दरवाढ आणि सवलतींचा अभाव यामुळे पारंपरिक व लघु मच्छिमारांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे नमूद करण्यात आले.

या प्रश्नावर राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हंटले कि, राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थाना पुरवठा करण्यात येणारा डिझेल हा घाऊक दर (Bulk rates) या प्रवर्गातुन करण्यात येत आहे. मागील काही दिवसापासून सुरु असलेल्या अमेरिका व इराण युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या इंधन तुटवड्यामुळे देशामध्ये इंधनाचे दर वाढलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. त्यानुसार महाराष्ट्रामध्ये डिझेलचे घाऊक दर (Bulk rates) किरकोळ दरांपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक झालेले आहेत. याचा काही अंशी परिणाम मासेमारी व्यवसायावर झालेला आहे. डिझेल दर वाढ झालेली असल्यामुळे उपजीविकेचे प्राथमिक साधन असलेल्या मच्छिमारांवर इंधनाच्या वाढीव खर्चाचा बोजा पडत आहे, ही वस्तुस्थिती आहे. सदरची दर वाढ झालेली असल्यामुळे याचा परिणाम मासेमारी व्यवसायावर झालेला असल्याने सदरची दर वाढ कमी करण्याबाबत मच्छिमार सहकारी संस्था यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आलेली आहेत. राज्यातील मच्छिमारांना आवश्यक असलेले डिझेल हे किरकोळ दर या प्रवर्गातुन पुरवठा होण्याबाबत शासनाने दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रान्वये मा. केंद्रीय मंत्री, पदुम, भारत सरकार यांना कळविलेले आहे.

---

## श्री संत गजानन महाराज मंदिरात ३६ व्या सामूहिक श्री गजानन विजय ग्रंथ पारायणाचे आयोजन रविवारी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर** : उमरेड मार्गावरील निर्मल नगरी येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात येत्या रविवारी, दि. २८ जून रोजी ३६ वे सामूहिक श्री गजानन विजय ग्रंथ पारायण भक्तिभावपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आले आहे.श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्टच्या वतीने या धार्मिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मंदिरात गेल्या अनेक महिन्यांपासून नियमितपणे सामूहिक पारायणाची परंपरा सुरू असून यंदाचे ३६ वे पारायण मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न होईल. रविवारी सकाळी ६ वाजता पारायणास प्रारंभ होईल. सकाळी ६ ते ११ या वेळेत श्री गजानन विजय ग्रंथातील १ ते २० अध्यायांचे वाचन करण्यात येईल. त्यानंतर सकाळी ११ ते ११.३० वाजेपर्यंत २१ व्या अध्यायाचे सामूहिक



प्रकट पठण होईल. यानंतर सकाळी ११.३० ते दुपारी १२ वाजेपर्यंत महाआरती आयोजित करण्यात आली असून दुपारी १२ वाजता सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे वितरण केले जाईल. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या भाविकांना आध्यात्मिक समाधानासह सामूहिक भक्तीचा अनोखा अनुभव मिळणार आहे. श्री गजानन महाराजांच्या चरणी श्रद्धा व्यक्त करण्यासाठी तसेच सामूहिक पारायणाच्या पुण्यप्राप्तीसाठी नागपूर शहरातील आणि परिसरातील सर्व भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट, निर्मल नगरी यांच्या वतीने करण्यात आले आहे. या निमित्ताने मंदिर परिसरात विशेष सजावट, पूजन व भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांच्या उपस्थितीने परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघणार आहे.

---

# शिवसेना (उबाठा) गटाचे एस. के. पुरो यांची उल्लेखनीय कामगीरी

## नागाव शाखे तर्फे नागाव प्राथमिक शाळच्या विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील नागाव उबाठा गट नागाव शाखेतर्फे शिवसेना वर्धापना दिनाचे औचित्य साधून नागाव प्राथमिक शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना नागाव पश्चिम विभाग प्रमुख एस के पुरो यांनी सालाबाद प्रमाणे २३जून२०२६रोजी सकाळी ११वाजता आयोजन केले होते.

या कार्यक्रमाला उबाठा गटाचे (रायगड उपजिल्हा प्रमुख) नरेश रहाळकर, (केगाव विभाग प्रमुख) जयवंप पाटील(नागाव शाखा प्रमुख ) सचिन म्हात्रे, माजी (म्हातवली शाखा प्रमुख )विष्णू पाटील,रवी पडते(माजी उप विभाग प्रमुख), सुर्यकांत दर्णे माजी केगाव वि.प्रमुख,चेतन नवालगी (ग्रामपंचायत सदस्य) पुष्पा शिंदे(महीला संघटक)ललीता गावंड(महीला संघटक) सौ कल्पना पाटील( मुख्यध्यापिका , सौ श्रद्धा( उपध्यापिका) म्हात्रे कृष्णकांत पाटील (मा.वि.प्रमुख) शिषिर म्हात्रे,हेमंत कांबळे,राम झिने,रुपेश म्हात्रे विद्यार्थीव पालक मोठया संख्येने उपस्थित होते.



या प्रसंगी नरेश रहाळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना हिंदू सम्राट बाळासाहेबांनी शिवसेना स्थापन करुन महाराष्ट्रातील गोर गरीब जनतेची सेवा कशी केली हे विद्यार्थ्यांना पटवून दिले जयवंत पाटील यांनी मार्गदर्शन करताना सकाळी लवकर उटण्याचे महत्व व फायदे हे सविस्तर पटवून दिले एस के पुरो यांनी प्रास्ताविक करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संजिव महेत्रे सर यांनी केले.

---

# जनतेच्या प्रश्नांसाठी दार सदैव खुले; समस्या कळवा, तात्काळ न्याय देऊ!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम,सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) वाशिमचे नूतन कार्यकारी अभियंता उदय बिरारिस यांची निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान जिल्ह्यातील रस्ते, सार्वजनिक बांधकामे, नागरिकांच्या समस्या तसेच विकासकामांशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर आणि मनमोकळ्या वातावरणात चर्चा करण्यात आली.वाशिम येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात पार पडलेल्या या भेटीत कार्यकारी अभियंता उदय बिरारिस यांनी पत्रकारांशी अत्यंत सकारात्मक संवाद साधत विभागाच्या कामकाजाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. जनतेच्या हितासाठी विभाग सदैव कटिबद्ध असून विकासकामांमध्ये पारदर्शकता व गुणवत्ता राखण्यास प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी बोलताना उदय बिरारी म्हणाले की, "पत्रकार हे समाज आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. नागरिकांच्या समस्या, रस्त्यांची दुरवस्था, अपूर्ण कामे किंवा विभागाशी संबंधित कोणतीही अडचण निदर्शनास आल्यास ती माझ्यापर्यंत पोहोचवा. प्रत्येक तक्रारीची गांभीर्याने दखल घेत तात्काळ न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल. जनतेच्या सेवेसाठी माझे



कार्यालय आणि विभागाचे दरवाजे नेहमी खुले आहेत."त्यांच्या या स्पष्ट आणि जनहितवादी भूमिकेचे पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. प्रशासन आणि प्रसारमाध्यमे यांच्यातील समन्वय वाढल्यास विकासकामांना अधिक गती मिळू शकते, असे मतही यावेळी व्यक्त

> **"विकासकामांबाबत कोणतीही समस्या, त्रुटी किंवा सूचना असल्यास नागरिकांनी आणि पत्रकारांनी ती नि:संकोचपणे माझ्यापर्यंत पोहोचवावी. प्रत्येक प्रश्नाला न्याय देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम सदैव तत्पर राहील."**
>
> **— श्री.उदय बिरारिस**
> **कार्यकारी अभियंता,**
> **सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी), वाशिम**

करण्यात आले.

जिल्ह्यातील विविध रस्त्यांची स्थिती, ग्रामीण भागातील विकासकामे, प्रलंबित प्रस्ताव, नागरिकांच्या अपेक्षा तसेच विभागाच्या आगामी नियोजनावरही यावेळी सकारात्मक चर्चा झाली.

या भेटीमुळे प्रशासन आणि पत्रकारिता क्षेत्रातील संवाद अधिक दृढ होण्यास मदत होणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

या प्रसंगी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तथा दैनिक युवक आधारचे वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे तसेच निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हा सचिव तथा दैनिक चालू वार्ताचे जिल्हा प्रतिनिधी प्रताप नागरी उपस्थित होते.

# विकसित भारत जी रामजी अधिनियम घेईल मनरेगाची जागा

## एक जुलैपासून राज्यात अंमलबजावणी; ग्रामीण कुटुंबांना 125 दिवसाच्या रोजगाराची हमी

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : ग्रामीण रोजगार आणि विकासाशी संबंधित अशा विकसित भारत जी रामजी अधिनियमाची अंमलबजावणी राज्यात एक जुलैपासून सुरू होत आहे.

ग्रामीण कुटुंबांना 125 दिवसाच्या कुशल मजुरी रोजगाराची वैधानिक हमी देणाऱ्या या कायद्यामुळे विकसित भारत @ 2047 च्या संकल्पनेशी सुसंगत ग्रामीण विकासाला चालना मिळणार आहे. या नवीन कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नागपूर विभाग सज्ज झाला आहे.

जी रामजी ही केंद्र पुरस्कृत योजना असून पूर्वीच्या मनरेगा अधिनियमाची जागा घेणार आहे. या अधिनियमामुळे आकुशल शारीरिक काम करण्यास तयार असलेल्या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ सदस्यांना आर्थिक वर्षात 125 दिवसाच्या मजुरी व रोजगाराची हमी मिळणार आहे. तसेच विकसित भारत या राष्ट्रीय दृष्टिकोनाची सुसंगत असा ग्राम विकासाचा आराखडा तयार करण्याला प्राधान्य राहणार आहे. त्यामुळे समृद्ध व सक्षम ग्रामीण भारतासाठी सशक्तीकरण, विकास, अभिसरण व समृद्धी यांना प्रोत्साहन मिळणार आहे.

या विधेयकांतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या कामांमध्ये विकसित भारत राष्ट्रीय ग्रामीण पायाभूत सुविधा स्टॅक ला प्राधान्य देण्यात येणार आहे. यामध्ये जलसुरक्षा तसेच जलसंवर्धन, मूलभूत ग्रामीण पायाभूत सुविधा, उपजिविका आधारित पायाभूत सुविधा आणि नैसर्गिक आपत्ती प्रतिबंधक कामांचा समावेश असणार आहे. जी रामजी अधिनियमाअंतर्गत कामांचे नियोजन विकसित ग्रामपंचायत आराखड्याद्वारे होणार आहे. हे आराखडे ग्रामपंचायत तयार करणार असून नियोजन पीएम गतिशक्ती व राष्ट्रीय अवकाशीय तंत्रज्ञान ज्ञानावर आधारित प्रणालीशी सुसंगत असणार आहे. यामुळे ग्रामपंचायतीची भौगोलिक




स्थिती व शहरीकरणाची पातळी लक्षात घेऊनच विकासाचे नियोजन होणार आहे.

शेतीच्या पीक हंगामामध्ये शेतीसाठी पुरेसे शेतमजूर उपलब्ध राहील याला प्राधान्य देण्यात आले आहे. यासाठी 60 दिवसाचा कालावधी आगाऊ सुनिश्चित करण्याचा अधिकार राज्यांना देण्यात आला आहे आणि या कालावधीत या अधिनियमाची अंमलबजावणी केली जाणार नाही त्यामुळे शेतीसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होईल.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासन व राज्य शासन यांच्यामध्ये निधी वाटपाची पद्धत निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार केंद्र शासन वस्तुनिष्ठ निकषाचा समावेश असलेल्या संयुक्त निर्देशांकांच्या निर्देशांकांच्या आधारे प्रत्येक राज्याला मानका आधारित निधी वाटप करणार आहे. यापेक्षा जास्त निधी खर्च झाल्यास संबंधित राज्य सरकारची जबाबदारी राहणार आहे.

नैसर्गिक आपत्ती किंवा आपण

### ■ विकसित भारत @2047 च्या संकल्पनेची सुसंगत ग्रामीण विकासाला प्रोत्साह
### ■ नागपूर विभाग अंमलबजावणीसाठी सज्ज

अपवादात्मक परिस्थितीत विशेष सूट दिली जाणार आहे. अधिनियमानुसार मदत सुनिश्चित करण्यासाठी वेळीच कारवाई करण्याची तरतूद राहणार आहे आवश्यकतेनुसार या तरतुदीमध्ये तात्पुरते बदल करण्यात येणार आहेत. अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय स्तरावर तसेच राज्यस्तरावर संचालन समिती अंमलबजावणीवर देखरेख पर्यवेक्षण व धोरणात्मक मार्गदर्शन करणार आहे. या योजनेच्या प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर समन्वय करण्याची जबाबदारी जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांची राहणार आहे. त्यासोबतच तालुका स्तरावरील कार्यक्रम अधिकारी रोजगाराची मागणी, प्रक्रिया, व्यवस्थापन आणि सहभागी नियोजन प्रक्रियांना सहाय्य करणार आहे. ग्रामपंचायत ग्रामीण रोजगार हमी कार्ड जारी करेल. विकसित ग्रामपंचायत आराखडे तयार करण्यासोबतच अधिनियमातील इतर कार्यासाठी जबाबदार राहणार आहे. या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायत ही प्राथमिक संस्था असेल. मजूर नोंदणी ग्रामीण रोजगार हमी कार्ड जारी करणे आणि प्राधान्यक्रमानुसार किमान 50% कामांची अंमलबजावणी करणे यासाठी ग्रामसभा नियमित घेणे तसेच सामाजिक लेखा परीक्षण करणे करण्याला प्राधान्य राहणार आहे. पंचायत समिती स्तरावर नियोजन प्रस्तावाचे संकलन व अभिसरण सुलभ केले जाईल. केंद्र शासनाकडून निश्चित केलेले मजुरीचे दर वेळेत दिले जाणार आहे.

**बेरोजगारी भत्ता हमी**

जी रामजी अधिनियमांतर्गत बेरोजगारी भत्ता देण्याची सुद्धा तरतूद करण्यात आली आहे. कामाची मागणी सादर केल्यानंतर निर्धारित कालावधीत काम उपलब्ध न झाल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार बेरोजगारी भत्ता देण्याची जबाबदारी राज्य शासनाची राहणार आहे. त्यासोबतच मजुरी देण्यासाठी विलंब झाल्यास त्यावर भरपाई देण्याची तरतूद या अधिनियमात आहे. विकसित भारत जी रामजी अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी नागपूर विभाग सज्ज असल्याची माहिती विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी दिली.

# अष्टगंध कला मंचाच्या नाट्य कलाकारांचा स्नेहमेळावा



**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : आयुष्याच्या धावपळीत अनेक नाती मागे पडतात. परंतु एखाद्या कलेच्या माध्यमातून जुळलेली मैत्री जिवंत राहते. अष्टगंध कला मंचाच्या वतीने शनिवारी दिनांक 23 ते रविवार दिनांक 24 असा दोन दिवस पाली परळी येथे गेट-टुगेदर अर्थात स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. प्रारंभी सर्व कलाकारांनी अष्टविनायकातील पालीच्या बल्लाळेश्वराचे मनोभावे दर्शन घेतले. या मेळाव्यात मागील शेकडो नाट्य प्रयोगांच्या सादरीकरणाच्या आठवणीने वातावरण भारावून गेले होते. हा स्नेहमेळावा रंगनायिका वैशाली मोहिते व विक्रम मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमात यावेळी श्री व सौ वैशाली विक्रम मोहिते यांच्या लग्नाचा वाढदिवस पारंपारिक रूढी परंपरांना उजाळा देत, मंगलाष्टका सादर करत, जुन्या आठवणींना जागवून, साजरा करण्यात आला. यावेळी नाटककार धनेश्वर म्हात्रे, रंगकर्मी विद्याधर म्हात्रे, हसूराम पाटील, कृष्णकांत म्हात्रे, अशोक म्हात्रे, दिगंबर कोळी, कैलासराजे घरत यांच्यासह अन्य कलाकारांनी नाट्य अभिनय सादर करून कार्यक्रमाला रंगत आणली.

बळीराम घरत, शशिकला, घरत यांच्या सौजन्याने घरत फार्म हाऊसमध्ये हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. पांडुरंग मोहिते, रमेश कोळी, जयकिसन मोकल, माणिक नाईक, अलंकार कडू, सुरेश पाटील, पुष्पा म्हात्रे, लता म्हात्रे, मयुरी घरत, ओवी घरत, कांचन म्हात्रे, शिल्पा कोळी, सुरेखा कोळी, देवयानी कोळी निकिता पाटील, प्रिशा कोळी, सही कोळी, समीर कोळी, आयुष मोहिते, राहुल कोळी, कौशिक म्हात्रे, साई म्हात्रे या सर्वांनी बेधुंदपणे नाच गाण्याचाही कार्यक्रम सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढविली.

# अवकाळी पाऊस व गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत द्या – आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची विधिमंडळात मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** राज्यातील अवकाळी पाऊस, भीषण गारपीट, वादळी वारे आणि बदलत्या हवामानामुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीचा गंभीर प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला. या प्रश्नाच्या माध्यमातून नाशिक, कोकण, रायगड, विदर्भ, मराठवाडा, लातूर, यवतमाळ, गडचिरोली, अहिल्यानगर, सांगली, संभाजीनगर व बीड यांसह विविध जिल्ह्यांमध्ये मार्च-एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतमाल, फळबागा, घरे, जनावरे तसेच जीवित व वित्तहानी झाल्याचा मुद्दा अधोरेखित करण्यात आला.

राज्यातील अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधले. राज्यात विशेषतः नाशिक, कोकण, रायगड, विदर्भ, मराठवाडा, लातूर, यवतमाळ, गडचिरोली, अहिल्यानगर, सांगली, संभाजीनगर व बीड यासारख्या अनेक जिल्ह्यात माहे मार्च-एप्रिल, २०२६ मध्ये झालेला अवकाळी पाऊस, भीषण गारपीट, वादळी वारा, बदललेले हवामान व इतर नैसर्गिक आपत्ती, मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्त हानीसह शेतमाल, घरे, जनावरे, पीक, फळ बाग व फळांवरील रोगांचा प्रादुर्भाव, पशुधन व जनावरांचा मृत्यू इत्यादी स्वरुपाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले तसेच, ग्रामीण भागात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून पावसामुळे वाळवणीसाठी ठेवलेल्या हळदीचे नुकसान, बऱ्याच ठिकाणी वीज पडून व नैसर्गिक आपत्तीमुळे दगावल्याची नोंद प्रशासनाकडे प्राप्त झाली तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे महसूल व कृषी विभागाकडून पाहणी करून त्यानंतर पंचनाम्याची प्रक्रिया सुरू न झाल्यामुळे तसेच संबंधित पथके गावांमध्ये अनुपस्थित असल्याने पंचनामे पूर्ण झाले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास, अनेक ठिकाणी झालेल्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण करण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून मदत निधी वितरणासाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करणे, पिक विमा योजनेची व्याप्ती वाढविणे (DBT) थेट लाभ हस्तातंरण पद्धतीने मदत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यासाठी शासनाने पंचनामे पूर्ण करण्याबाबत जिल्हा प्रशासनास विशेष निर्देश दिले आहेत काय, असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने हवामानाच्या अंदाजाची अचूकता सुधारण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व पशुपालकांना आर्थिक मदत, पीकविमा, जनावरांच्या नुकसानीची भरपाई देणे, मृतांच्या वारसांना मदत तसेच वीज पुरवठा पुर्ववत व वीज प्रतिबंधक यंत्र बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न दाखल केला होता.

राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव (पाटील) यांनी दिलेल्या लेखी उत्तरात, राज्यात विशेषतः नाशिक कोकण, रायगड, विदर्भ, मराठवाडा, लातूर, यवतमाळ, गडचिरोली, हिल्यानगर सांगली, संभाजीनगर व बीड यासारख्या अनेक जिल्ह्यात माहे मार्च-एप्रिल, २०२६ मध्ये झालेला अवकाळी पाऊस, भीषण गारपीट, वादळी वारा, बदललेले हवामान व इतर नैसर्गिक आपत्ती, मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्त हानीसह शेतमाल, घरे, जनावरे, पीक, फळ बाग व फळांवरील रोगांचा प्रादुर्भाव, पशुधन व जनावरांचा मृत्यू इत्यादी स्वरुपाचे नुकसान झाले असल्याचे खरे आहे. हळदीचे नुकसान झाल्याची बाब आढळुन आलेली नाही. काही ठिकाणी वीज पडून व नैसर्गिक आपत्तीमुळे जिवित हानी झाली आहे. बाधित क्षेत्राचे पंचनामे पूर्ण करुन पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात डिबीटी प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये मनुष्यहानी झाल्यास मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना सहाय्य व जखमींना तातडीने मदत करणे शक्य व्हावे. तसेच पशुहानी झाल्यास पशुधन खरेदीसाठी शेतकऱ्यांना मदत वाटप करणे शक्य व्हावे, म्हणून उणे प्राधिकार पत्रावर कोषागारातून रक्कम आहरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे त्यानुसार जिल्हास्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. वीज पुरवठा खंडित झाल्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारीची नोंद घेऊन महावितरणाकडून तात्काळ दुरुस्तीची प्रधानमंत्री पीक विमा योजनेंअतर्गत शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

# सिल्लोडमध्ये भाजपाची संघटनात्मक बैठक

## प्रदेश सरचिटणीस सुनील राणे यांच्या उपस्थितीत मतदार यादी पुनरावलोकनाचा आढावा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : भाजपा प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार सुनील राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत सिल्लोड-सोयगाव मतदारसंघातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची एसआयआर (विशेष संक्षिप्त पुनरिक्षण) मतदार यादी पुनरावलोकन आणि संघटनात्मक बैठक उत्साहात पार पडली. यावेळी राणे यांनी उपस्थितांना केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील फडणवीस सरकारच्या लोककल्याणकारी योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले.बैठकीत मतदार यादी पुनरावलोकन, नवमतदार नोंदणी, मतदार पडताळणी तसेच बूथस्तरावरील कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक बूथ सक्षम करण्यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने काम करावे, अशी सूचना सुनील राणे यांनी केली. सिल्लोड-सोयगाव मतदारसंघातील कार्यकर्त्यांची जिद्द, संयम आणि संघटनात्मक ताकद या बैठकीत दिसून आली. 'कार्यकर्ता कंटाळणार नाही, थकणार नाही आणि पक्षाच्या कामासाठी कोणत्याही



परिस्थितीत सज्ज राहील,' याचा प्रत्यय या बैठकीतून आला. कार्यकर्त्यांच्या ऐतिहासिक उपस्थितीमुळे ही बैठक विशेष ठरली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिल्लोड-सोयगाव विधानसभा एसआयआर प्रमुख सुरेशजी बनकर यांनी केले. यावेळी व्यासपीठावर भाजपा अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी, भाजपा जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर पाटील मोठे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुनील मिरकर, शिवाजीराव बुडाळ, जिल्हा परिषद सदस्य राधाकृष्ण काकडे, सचिन वाघ, अरुण काळे, भाजपा सिल्लोड शहर मंडळ अध्यक्ष मनोज मोरेल्लू, भवन मंडळाध्यक्ष एकनाथ हिवाळे, अंधारी मंडळ अध्यक्ष नारायण खोमणे, शिवना मंडळाध्यक्ष आत्माराम पाडळे, सोयगाव मंडळ अध्यक्ष संजय पाटील, उपसभापती भगवान आहेर, पंचायत समिती सदस्य अनिल खरात, माजी सभापती ज्ञानेश्वर तायडे, मेघराज चौडीये, रामदास हिवाळे, पंचायत समिती सदस्य किशोर जगताप, अंकुश कोठाळे, बनसोड, कैलास जंजाळ, गजानन जाधव, गजानन पवार, माजी नगराध्यक्ष कैलास काळे, संतोष जाधव, सुनील गावंडे, नगरसेवक गणेश भूमकर, स्वप्निल शिंगारे, राजेंद्र दाडगे, जयप्रकाश चव्हाण, संजीवन सोनवणे, बद्री राठोड, मंगेश सोहनी, विष्णू गव्हाणे, सुनील ठोंबरे, मयूर मनगटे, ईश्वर शिरसागर, ज्ञानेश्वर ताठे, सांडू पाटील दौड, जगदीश कवाल, गुलाबराव कोलते, सुरज कवाल, अण्णा तांगडे, समाधान बावस्कर, योगेश शिंदे, प्रकाश गाडेकर, विठ्ठल वानखेडे, महेंद्र सुरडकर, त्रिंबक गव्हाणे, दिगंबर मोरे, रामचंद्र मोरे, भूषण गौर, रघुनाथ पांडव, नारायण बडक, दत्ता बडक, अमोल कुलकर्णी, अतुल साळवे, रघुनाथ तायडे, सारंग जैवळ, ऋशिंदर शिंदे, सोमीनाथ कळम, साहेबराव बाबर्डे, दिगंबर सांगळे, मच्छिंद्र पालोदकर, सलीम मुलतानी, ज्ञानेश्वर वाहटूळे, उत्तम शिंदे, साहेबराव दाडगे, योगेश शिंदे, शुभम अन्विकर, भाऊसाहेब उबाळे, योगेश खोमणे, गजानन घोंगटे, दिलीप पालोदे, देविदास पंडित, दिपक सपकाळ यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार भाजपा जिल्हा सचिव कमलेश कटारिया यांनी मानले.

# घरकुल लाभार्थ्यांच्या रखडलेल्या हप्त्यांवर विधानसभेत आमदार प्रशांत ठाकूर यांचा आवाज

### घरकुल योजनांतील निधीवाटप व बांधकाम प्रक्रियेला गती – मंत्री जयकुमार गोरे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना तसेच इतर घरकुल योजनांतील प्रलंबित कामे आणि लाभार्थ्यांना मिळणाऱ्या हप्त्यांमधील विलंबाचा मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित करून या विषयावर शासनाचे लक्ष केंद्रित केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्यातील घरकुल योजनांच्या अंमलबजावणीतील विलंब, लाभार्थ्यांना वेळेवर निधी न मिळणे, 'स्पर्श' प्रणालीतील तांत्रिक अडचणी, बांधकाम साहित्याच्या वाढत्या किमती आणि त्यामुळे अपूर्ण राहिलेल्या घरकुलांचा प्रश्न सभागृहात मांडला. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)-२ अंतर्गत मंजूर घरांपैकी केवळ १२ टक्के घरे पूर्ण झाली असून उर्वरित २४ लाख २९ हजार ९९८ घरकुलांची कामे प्रलंबित असल्याकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले. रायगड, सिंधुदुर्ग, चंद्रपूर, जळगाव, सोलापूर, कोल्हापूर, लातूर, वाशिम, पालघर, नांदेड, परभणी, जालना आणि नागपूरसह विविध जिल्ह्यांतील हजारो घरकुलांची कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आणून देत लाभार्थ्यांना दुसरा, तिसरा व पुढील हप्ता वेळेत मिळत नसल्याची बाबही त्यांनी अधोरेखित केली. त्या अनुषंगाने आमदार समीर कुणावार आणि आमदार निलेश राणे यांनी सभागृहात उपप्रश्न उपस्थित केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या तारांकित प्रश्नाला ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले की, प्रधानमंत्री आवास योजना या योजनेंतर्गत SNA SPARSH प्रणाली लागू झाली. सदर योजनेसाठी माहे एप्रिल, २०२६ ऐवजी माहे मे, २०२६ मध्ये निधी प्राप्त झाला. केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनेसाठी पर्याप्त निधी उपलब्ध असून लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग केला जात आहे. वाढत्या महागाईचा विचार करून राज्याने दिनांक ०४ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये टप्पा-२ मधील लाभार्थ्यांना ५० हजार रुपये अतिरिक्त अनुदान मंजूर केले आहे. या शिवाय राज्याने दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तांत्रिक अडचणी सोडवून SNA SPARSH प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात हप्ते वितरणाची प्रक्रिया ऑनलाईन होत असल्याने लाभार्थ्यांना पाठपुरावा करण्याची आवश्यकता राहिलेली नाही. तात्पुरत्या निवाऱ्यात राहणाऱ्या लाभार्थ्यांना प्राधान्य देऊन त्यांचे घरांचे बांधकाम पावसाळ्यापूर्वी कालबध्द नियोजन करुन छताच्या पातळीपर्यंत पूर्ण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गृहनिर्माण अभियंता, ग्रामसेवक यांचेद्वारे थेट बांधकामावर भेट देवून मार्गदर्शन व सहाय्य केले जात आहे, जेणेकरून लाभार्थ्यांची गैरसोय होणार नाही. राज्यातील प्रत्येक नागरिकाला स्वतःचे हक्काचे घर मिळावे यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. घरकुल योजनेच्या निधी बाबत कोणतीही कमतरता नसून लाभार्थ्यांच्या हप्त्यांचे पैसे कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाहीत, अशी ग्वाही देत राज्यात पुढील एक वर्षांत १५ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत सांगितले. मागील वर्षी राज्याला २९ लाखावर घरांचे उद्दिष्ट मिळाले होते. त्यापैकी २८.१७ लाख लाभार्थी निश्चित करून २७ लाख ८५ हजार ७२४ घरांना मंजुरी देण्यात आली. आतापर्यंत २६ लाख घरांना पहिला, १७ लाख घरांना दुसरा आणि ११ लाख घरांना तिसरा हप्ता वितरित करण्यात आला आहे; आजपर्यंत ६ लाख ५ हजार ५९६ घरे पूर्ण झाली असून एका वर्षात ६ लाख घरे पूर्ण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. २०२५-२६ मध्ये ५ हजार २९० कोटी रुपये, २०२६-२७ मध्ये १३ हजार ९४७ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. केंद्र सरकारच्या ऑनलाइन निधी वितरण प्रणालीमध्ये अडचणी आल्याने हप्ते देण्यास विलंब झाला; मात्र आता ही प्रक्रिया सुरळीत सुरू असून कोणत्याही घरकुल लाभार्थ्यांचे पैसे थांबणार नाहीत असेही मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

# देशसेवेचा अभिमान ! सणसरच्या शुभम खटकेचा ग्रामस्थांकडून नागरी सत्कार

# ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विकासासाठी एकजुटीचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**सणसर :विकास क्षत्रिय** : सणसर गावातील युवक शुभम शिवाजी खटके याने अवघ्या १९ व्या वर्षी भारतीय सैन्यात (इंडियन आर्मी) भरती होऊन यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल सणसर येथील सिल्वर ओक प्रतिष्ठानच्या वतीने त्याचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.देशसेवेसाठी सैन्यात दाखल झालेल्या शुभमच्या यशामुळे संपूर्ण सणसर गावात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी त्याचे आणि त्याच्या कुटुंबाचे विशेष कौतुक केले.सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या शुभम खटके याच्या यशामागे त्याचे वडील शिवाजी खटके व चुलते तानाजी खटके यांचे मोठे योगदान असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कुटुंबाचा सांभाळ करत मुलांना चांगले संस्कार देऊन देशसेवेसाठी प्रेरित केल्याबद्दल ग्रामस्थांनी खटके कुटुंबाचे आभार मानले. या सत्कार समारंभास छत्रपती साखर कारखान्याचे संचालक रामचंद्र निंबाळकर शिवाजीराव निंबाळकर ज्येष्ठ माजी संचालक विठ्ठलभाऊ निंबाळकर,माजी सभापती तुकाराम आबा काळे,मार्केट कमिटीचे संचालक संग्रामसिंह निंबाळकर,माजी सरपंच विजय आबा पाटील, माजी चेअरमन विक्रमभैय्या निंबाळकर,माजी सरपंच राहुल काळे,यजुर्वेंद्रसिंह निंबाळकर ॲड.विलास खटके,माजी उपसरपंच अभयसिंह निंबाळकर,जेष्ठ नेते अशोक काळे,संजय काळे दिलीप भोईटे,हिंदुराव भोईटे,श्रीनिवास कदम, मारुती निंबाळकर,सुनील निंबाळकर,मिथुन बारवकर, औदुंबर पाटील,अनिल शेंडगे,गोटू चव्हाण,सचिन फुले,संदीप गाडेकर,अनिकेत निंबाळकर,लखन पवार,श्रीराज निंबाळकर यांच्यासह



मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी माजी चेअरमन विक्रमभैय्या निंबाळकर यांनी आपल्या मनोगतात शुभम खटकेच्या जिद्दीचे कौतुक करत गावातील युवकांनी त्याचा आदर्श घ्यावा,असे आवाहन केले. दरम्यान,कार्यक्रमात बोलताना छत्रपती कारखान्याचे संचालक रामचंद्र निंबाळकर यांनी आगामी सणसर ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण भूमिका मांडली. ग्रामपंचायत निवडणूक लवकरच जाहीर होणार असून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले."गावाचा विकास,पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या प्रश्नांवर एकजुटीने काम करण्याची वेळ आली आहे," असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले.रामचंद्र निंबाळकर यांच्या या वक्तव्याला उपस्थित ग्रामस्थांनी टाळयांच्या कडकडाटात जोरदार प्रतिसाद दिला. त्यांच्या भूमिकेचे समर्थन करत ज्येष्ठ नेते अशोक काळे यांनीही ग्रामस्थांच्या भावना व्यक्त केल्या.ग्रामपंचायत ही राजकारणाचा आखाडा न बनता गावाच्या विकासाचे केंद्र बनले पाहिजे,अशी भूमिका त्यांनी मांडली.

आगामी निवडणुकीत गावहिताला प्राधान्य देणारे नेतृत्व निवडण्यासाठी नागरिकांनी सजग राहावे, असे आवाहनही त्यांनी केले. देशसेवेचा मान मिळवून गावाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या शुभम खटकेच्या सत्कारासह सणसरच्या आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विकास,एकजूट आणि नव्या नेतृत्वाबाबत झालेली चर्चा हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण बिंदू ठरला.

# केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

## क्रांतीज्योती महिला संघटनेचे पंतप्रधानांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा** : देशभरात नीट, सीईटी, यूजीसी-नेट, एमपीएससी तसेच विविध स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर क्रांतीज्योती महिला संघटना, लाखनी यांच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन सादर करून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या तात्काळ राजीनाम्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, देशातील परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असून वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थी आणि पालक मानसिक तणावाखाली आहेत. नीट परीक्षेतील गोंधळ, फेरपरीक्षा आणि त्यानंतरही समोर आलेल्या गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

संघटनेच्या मते, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांमध्ये नैराश्याचे वातावरण निर्माण झाले असून काही विद्यार्थ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याच्या घटनाही अत्यंत चिंताजनक आहेत. देशाच्या भवितव्याचा कणा असलेल्या विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होत असलेला हा खेळ थांबविण्यासाठी



केंद्र सरकारने तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

शिक्षण व्यवस्थेतील कथित अपयशामुळे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना नैतिक जबाबदारी स्वीकारून पदमुक्त करावे तसेच शिक्षण क्षेत्रात व्यापक सुधारणा करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

दरम्यान, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास संपूर्ण भंडारा जिल्ह्यात तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.निवेदन सादर करताना क्रांतीज्योती महिला संघटनेच्या अध्यक्ष अश्विनी दिलीप भिवगडे, सचिव हर्षा वंजारी, महाप्रज्ञा बुद्ध विहार लाखनीच्या उपाध्यक्ष सुमन कानेकर, सामाजिक कार्यकर्ते दीपक जनबंधू, अक्षरा खोब्रागडे, पल्लवी खिराडे, वर्षा हुमणे, साधना शिंगाडे, नलिनी ढवळे, कमल गणवीर आदी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद कोयाळ शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**आष्टी (प्रतिनिधी):** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोयाळ येथे सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणप्रेमाचा सुंदर संगम पाहायला मिळाला. दिवंगत कै. साहेबराव श्रीपती मोरे, कै. यमुनाबाई साहेबराव मोरे व कै. ताराबाई महादेव मांगडे यांच्या स्मरणार्थ इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच युवा उद्योजक तथा ए-1 उद्योग समूहाचे संचालक वसीम अहमद शेख यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वह्या, लेखन साहित्य व सर्व विद्यार्थ्यांना बिस्किटांचे वाटप करून वाढदिवसाचे औचित्य सामाजिक कार्यातून साजरे केले.

दिवंगत व्यक्तींच्या स्मृती चिरंतन राहाव्यात आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक भाग म्हणून श्री. दादासाहेब पोपट मांगडे यांच्या वतीने हा स्तुत्य उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पेन्सिल व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य देण्यात आले. शालेय जीवनाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत



मिळाल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमास कोयाळचे सरपंच श्री. सागर (दादा) दरेकर प्रमुख उपस्थित म्हणून लाभले. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी मन लावून शिक्षण घ्यावे व अशा उपक्रमांमधून प्रेरणा घेऊन भविष्यात समाजासाठी कार्य करावे, असे आवाहन केले.

या प्रसंगी युवा नेते ऋषिकेश भैय्या दरेकर, पोपटराव आमटे, दादासाहेब शिवाजी मांगडे, नंदू यादव मुरूमकर, दादासाहेब दरेकर, रभाजी पवने, महादेव बाबासाहेब मुरूमकर, केशव टेकाळे, अंबादास मुरूमकर, आलिम शेख, गोरख मांगडे, गणेश आमटे, समाधान गायकवाड, सुरेश बेरड, अजिनाथ बनकर, अनिल मुरूमकर, गणेश गायकवाड, भीमराज मुरूमकर, रवींद्र आमटे, संदीप आमटे, संतोष गुंड, प्रल्हाद मुरूमकर, अशोक मुरूमकर, रमेश गायकवाड, शरद खकाळ, नवनाथ गुंड, ज्ञानेश्वर मांगडे, उदव आमटे, ज्ञानेश्वर धावडे व प्रशांत पवने राजू आमटे दीपक मुरूमकर यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

याच कार्यक्रमात वसीम अहमद शेख यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वह्या, लेखन साहित्य तसेच सर्व विद्यार्थ्यांना बिस्किटांचे वाटप केले. केवळ केक कापून वाढदिवस साजरा करण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा त्यांनी घेतलेला पुढाकार उपस्थितांच्या विशेष कौतुकास पात्र ठरला. त्यांच्या या कृतीमुळे समाजात सकारात्मक संदेश गेला असून युवकांनी सामाजिक जाणीव जपत असे उपक्रम राबवावेत, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री. गांगर्डे सर, श्री. चौरे सर तसेच श्रीमती बनसोडे मॅडम यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व समाजात शिक्षणाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमांचे पालक, शिक्षक व ग्रामस्थांनी मन:पूर्वक स्वागत करून आयोजकांचे अभिनंदन केले.

# नॅशनल सहकारी सूतगिरणीच्या संचालकपदी विश्वास दाभाडे व सयाजीराव वाघ यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : नॅशनल सहकारी सूतगिरणीच्या संचालक मंडळातील रिक्त झालेल्या दोन जागांसाठी पार पडलेल्या निवडणूक प्रक्रियेत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विश्वास संपत दाभाडे आणि सयाजीराव वाघ यांची बिनविरोध निवड झाली. निवडीची घोषणा होताच उपस्थितांनी टाळयांच्या गजरात नवनिर्वाचित संचालकांचे स्वागत केले.

गेल्या काही दिवसांपूर्वी कापूस उत्पादक संघ व बिगर कापूस उत्पादक संघातील प्रत्येकी एका संचालकाने राजीनामा दिल्याने ही दोन पदे रिक्त झाली होती. त्यानुसार आज नॅशनल सहकारी सूतगिरणीच्या



कार्यालयात निवडणूक प्रक्रिया पार पडली. कापूस उत्पादक संघातून विश्वास संपत दाभाडे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता. त्यांच्या उमेदवारीस राजेंद्र ठोंबरे यांनी सूचक तर कौतिकराव मोरे यांनी अनुमोदन दिले. तसेच बिगर कापूस उत्पादक संघातून सयाजीराव वाघ यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाला. त्यांच्या उमेदवारीस विठ्ठल सपकाळ यांनी सूचक तर शंकरराव खांडवे यांनी अनुमोदन दिले. दोन्ही गटांतून प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दोघांचीही बिनविरोध निवड जाहीर केली.

या निवडणूक प्रक्रियेसाठी सहायक निबंधक विजयसिंह लखवाल यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांना संस्थेचे कार्यकारी संचालक विमलेश त्रिपाठी तसेच कर्मचारी गणेश डकले यांनी सहकार्य केले.

यावेळी नगराध्यक्ष तथा नॅशनल सहकारी सूतगिरणीचे चेअरमन अब्दुल समीर अ. सत्तार, व्हाईस चेअरमन नरेंद्र उर्फ बापू पाटील, जि.प.सदस्य तथा संचालक अब्दुल आमेर अ. सत्तार , उपनगराध्यक्ष तथा संचालक विठ्ठल सपकाळ, संचालक शंकरराव खांडवे, रहू बागवान, कौतिकराव मोरे, शेख सलीम बिकान, विशाल जाधव, पांडुरंग जीवरग, यासीन बागवान, राजेंद्र ठोंबरे , आसिफ बागवान आदींची उपस्थिती होती.

निवडणुकीचा निकाल जाहीर होताच नगराध्यक्ष तथा चेअरमन अब्दुल समीर सत्तार यांच्या हस्ते नवनिर्वाचित संचालक विश्वास दाभाडे व सयाजीराव वाघ यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करीत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी जिल्हा बँकेचे माजी चेअरमन अर्जुन गाढे, कृउबा समितीचे उपसभापती संदीप राऊत , दुर्गाबाई पवार तसेच बाळू दौगे, गणेश डोईफोडे, गजानन चाथे, गणेश सयाजीराव वाघ आदींची उपस्थिती होती.

# जिरडगाव फाट्यावर रस्त्यात साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांची जीवघेणी कसरत, तीन वर्षांपासून रखडले काम

**दैनिक युवक आधार**

**घनसावंगी (एकनाथ जाधव) :** विरेगाव ते कुंभारी पिंपळगाव रस्त्यावरील जिरडगाव फाट्यावर पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचल्याने नागरिकांना आणि वाहनचालकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.रस्त्यावर गुडघाभर पाणी साचल्याने तसेच जिरडगाव जवळ पुलाचे देखील काम झाले नसल्यामुळे दुचाकीस्वार, शाळकरी मुले आणि पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून ये-जा करावी लागत आहे.अनेक दुचाकी घसरून लहान-मोठे अपघातही घडत आहेत. स्थानिकांच्या माहितीनुसार, या रस्त्याचे काम गेल्या तीन वर्षांपासून रखडले आहे. निधी मंजूर होऊनही कामाला मुहूर्त लागलेला नाही. पावसाळ्यात दरवर्षी हीच समस्या उद्भवते.रस्त्यावर साचलेल्या पाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीही तात्पुरती व्यवस्था करण्यात आलेली नाही.सार्वजनिक बांधकाम विभाग असो किंवा ग्रामपंचायत, संबंधित यंत्रणा पूर्णपणे



दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.रोजचा हा त्रास असह्य झाला आहे. मुलांना शाळेत पाठवताना भीती वाटते. रुग्णवाहिका सुद्धा वेळेवर पोहोचू शकत नाही, असे एका स्थानिक ग्रामस्थाने सांगितले.

संतप्त नागरिकांनी या प्रकरणी सरकारने तातडीने लक्ष घालून रस्त्याचे काम त्वरित सुरू करावे, अशी मागणी केली आहे. तसेच कामात दिरंगाई करणाऱ्या जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर व कंत्राटदारावर कठोर कारवाई करावी,अशी जोरदार मागणी नागरीक करीत आहेत. पावसाळा अजून बाकी असल्याने समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने तातडीने पाण्याचा निचरा करून रस्ता वाहतुकीस योग्य करावा आणि संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला देऊन रखडलेले काम युद्धपातळीवर सुरू करावे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. संबंधित यंत्रणा गंभीर प्रश्नाकडे लक्ष देणार का,याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# कार्लेखिंड घाटात घसरली एसटी, पण चालक ठरला देवदूत; सर्व प्रवासी सुखरूप

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** अलिबाग-पेण मार्गावरील धोकादायक आणि वळणदार कार्लेखिंड घाटात गुरुवारी सकाळी एक मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. पेण-अलिबाग मार्गावरील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) बस (एमएच 20 बीएल 691) सागाव बसथांब्याजवळ रस्त्यावर घसरून (स्लिप होऊन) थेट रस्त्याच्या कडेला उतरली. मात्र बसचालकाच्या प्रसंगावधान, धाडस आणि सतर्कतेमुळे बसवरील नियंत्रण कायम राखण्यात यश आल्याने संभाव्य भीषण अपघात टळला आणि बसमधील सर्व प्रवासी सुखरूप बचावले.घटनेनंतर काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घाटातील तीव्र वळणे, रस्त्यावर साचलेले पावसाचे पाणी आणि निसरडा झालेला रस्ता यामुळे बसचा ताबा काही क्षणांसाठी सुटल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. बस अचानक रस्त्याच्या कडेला झुकल्याने प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. काही क्षणांसाठी



प्रवाशांच्या काळजाचा ठोका चुकला होता.

मात्र अनुभवी चालकाने प्रसंगाचे गांभीर्य ओळखून अत्यंत संयमाने बसवर नियंत्रण मिळवले. बस आणखी काही फूट पुढे गेली असती तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. चालकाच्या योग्य निर्णयक्षमतेमुळे आणि धाडसी कृतीमुळे अनेक प्रवाशांचे प्राण वाचल्याची भावना प्रवाशांनी व्यक्त केली.घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणा आणि स्थानिक मदतकार्य पथके घटनास्थळी दाखल झाली. बस रस्त्याच्या कडेला उतरल्याने काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. मात्र प्रशासनाने तातडीने परिस्थिती हाताळून वाहतूक सुरळीत केली.

सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही किंवा कोणालाही दुखापत झाली नाही. सर्व प्रवाशांची सुरक्षित सुटका करण्यात आली. त्यामुळे संभाव्य दुर्घटनेचे संकट टळल्याने प्रवाशांसह त्यांच्या नातेवाईकांनीही सुटकेचा निश्वास सोडला.पावसाळ्यात वाहनचालकांनी घ्यावी विशेष काळजी*दरवर्षी पावसाळ्यात घाटमाथ्यावरील रस्ते निसरडे होत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढते. त्यामुळे वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवणे, वाहनांमधील सुरक्षित अंतर राखणे, ब्रेक आणि टायरची नियमित तपासणी करणे तसेच घाट परिसरात विशेष सतर्कता बाळगणे आवश्यक आहे. काही क्षणांचा निष्काळजीपणा जीवावर बेतू शकतो. त्यामुळे "सुरक्षित प्रवास हाच सर्वोत्तम पर्याय" हा संदेश या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाला आहे.दरम्यान, चालकाच्या धाडसी आणि समयसूचक कृतीबद्दल प्रवाशांकडून त्यांचे विशेष कौतुक करण्यात येत असून, "चालकाच्या प्रसंगावधानामुळे आम्ही आज सुरक्षित आहोत," अशा भावना अनेक प्रवाशांनी व्यक्त केल्या.